मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/ ३३२/०२
तक्रार क्रमांक २००९/ ३३३/०२

श्री.हर्ष पिपालिया — तक्रारदार
अे/७०२/७०३, राहूल एन्क्लेव्ह
साईबाब नगर, बोरीवली (प)
मुंबई ४०० ०९२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,(इ.प्र.)/पश्चिम
उपनगरे, मुबई मनपा पश्चिम उपनगरे, — उत्तरवादी
कांदिवली (प),मुंबई ४०० ०६७

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
पश्चिम उपनगरे, मुंबई मनपा, कांदिवली (प)
मुंबई ४०० ०६७

-विवेचन-

तक्रारीचा दिनांक : ५.१.२००९ व १२.१.२००९

सुनावणीचा दिनांक : ४.५.२००९

सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास आयोगाच्या आदेशानुसार दि.९.१.२००९ रोजी माहिती प्राप्त झालेली आहे. अर्जदारास माहिती देण्यास असद्हेतू नसल्याने दंडाचे अथवा विभागीय चौकशीचे आदेश नाहीत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ४मे २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/ २३/०२

श्री.अंमलदार रामलखनसिंग ठाकूर — तक्रारदार
बीएलएचरुम नं.३१९
कुर्ला कदम सह.गृहनिर्माण संस्था,
कुर्ला (प) मुंबई ४०० ०२४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण नि व क्षेत्रविकास मंडळ — उत्तरवादी
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू)
मुंबई ४०००५१

जन माहिती अधिकारी तथा भूव्यव्यवस्थापक (कुर्ला)
मुंबई गृहनिर्माण नि व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू)
मुंबई ४०००५१

-विवेचन-

तक्रारीचा दिनांक : १.९.२००८

सुनावणीचा दिनांक : ४.५.२००९
सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

आयोगाच्या दि.३०.६.२००८ रोजीच्या आदेशाने अर्जदारास माहिती देण्यांत आली होती व त्याची प्रत आयोगाकडेही पाठविण्यांत आली होती. अर्जदारास त्यांचे पत्र मिळालेले दिसत नाही. त्यामुळे त्यांनी तक्रार केलेली दिसते.

सुनावणीच्या वेळी कागदपत्र अर्जदारास देण्याबाबत जन माहिती अधिक ारी यांना निर्देश देण्यांत आले. माहिती अधिकार अधिनियमान्वये रेकॉर्डला जसे कागदपत्र असतील त्याच्या प्रती देता येतात. परंतू कागदपत्रातील नमूद केलेल्या पात्र व अपात्रता व्यक्तिविषयी आयोगाने छाननी करण्याची तरतूद नाही. अर्जदारास याबाबतचा निर्णय मान्य नसेल तर त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे त्या कायद्याखाली दाद मागावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४.मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२५०/०२

श्री.मुकूंद के पारीख, अपिलार्थी
१०३ चाणाक्य पूरी सीएचएस ललूभाई पार्क,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सचिव
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र मुंबई उत्तरवादी
१३ वा मजला नविन प्रशासकिय भवन,
मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र मुंबई
१३ वा मजला नविन प्रशासकिय भवन,
मंत्रालय,मुंबई ३२

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : २७.९.२००८

सुनावणीचा दिनांक : ४.५.२००९

सुनावणीस अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराचा जो अर्ज होता त्या अर्जात माहिती मागितलेली नसून त्यात खुलासा मागितलेला होता म्हणून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारलेली आहे.

अर्जदाराचे हे मुद्दे तांत्रिकदृष्टया माहितीच्या अधिकारात स्विकृत करता येण्यासारखे नसले तरी ते मुद्दे हे महत्वाचे आहेत. त्यामुळे त्यांनी मागितलेल्या खुलाशाच्या बाबतीत पुढीलप्रमाणे स्थिती स्पष्ट करण्यांत येत आहे:-

१. अर्जदार हे स्वतः उपस्थित राहू शकत नसतील तर कारणे नमूद करुन त्यांचा प्रतिनिधी पाठवू शकतील.
२. या प्रतिनिधीजवळ मुळ अर्जदाराचे ऑथॉरायझेशन असेल तर त्यांना कागदपत्र सुध्दा उपलब्ध करुन घेता येतील. कागदपत्र स्विकृत करण्यापूर्वी असे कागदपत्र तपासणी करण्याचे अधिकार सुध्दा या प्रतिनिधीला असतील.

अर्जदाराने कलम ६ खाली प्राप्त झालेल्या अर्जानुसार देत असलेली माहिती किती पृष्ठांची आहे व त्यासाठी किती रक्कम भरणे आवश्यक आहे व पोष्टाने पाठवावयाचे असेल तर त्यासाठी किती पोस्टेज लागेल हे अर्जदारास कळवावयास पाहिजे. त्यामुळे अर्जदारास पृष्ठ व फी आहे याची माहिती होऊ शकते.

अपिलार्थीचा अर्ज हा माहिती अधिकार अधिनियमाखाली न मानता प्रशासकिय अर्ज समजण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**<u>-आदेश-</u>**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ४.मे २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/ ३४८/०२

श्रीमती जयमाला गोडबोले — तक्रारदार
व्दारा के.जे. सोमय्या ट्रस्ट,
४५,४७ एम.जी. रोड,
फाझलभाय बिल्डिंग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव
वन विभाग, — उत्तरवादी
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (भु - अभिलेख)
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,
मुंबई ४०० ००२३

-विवेचन-

तक्रारीचा दिनांक : ६ मार्च २००९

सुनावणीचा दिनांक : ४.५.२००९
सुनावणीस तक्रारदार व संबंधित दोन्ही विभागाचे जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास सॉलट पॅन विभागातील भुकर क्रमांक २ व २/२ च्या मिळकतीच्या मोजणी नकाशाची प्रत पाहिज होती. त्यासाठी जमिन महसूल कायदयानुसार त्यांनी योग्यते शुल्कही भरले होते. ही प्रत त्यांना न मिळाल्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाखाली दि.२.२.२००९ रोजी अर्ज केला होता व त्यांना उपसंचालक, भूमिअभिलेख, कोकण विभाग यांच्या दि.९.११.२००८ च्या आदेशाविरुध्द सुनावणीचे काम महसूल व वन विभाग यांच्याकडे प्रलंबित असल्याने तूर्त मोजणी नकाशे देण्यास विलंब होत आहे असे कळविण्यांत आले. त्या विरुध्द अर्जदाराने आयोगाकडे तक्रार केलेली आहे. तसेच याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल सुध्दा सादर केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दि.२७.४.२००९ रोजीच्या आदेशानुसार अर्जदारास हवी असणारी माहिती देण्याचा निर्णय दिलेले आहे व त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन ताबडतोब करावे असे निर्देश देण्यांत येत आहेत.सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

-आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४.मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२५७/०२

श्री.क्लेटस गोन्साल्विस — अपिलार्थी
११८-ज गोन्साल्विस बिल्डिंग,
मरोळ व्हिलेज, अंधेरी (पूर्व)
मुंबई ४०० ०५९

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा असिस्टंट कमिशनर
बृहन्मंबई मनपा के/पूर्व विभाग कार्यालय, — उत्तरवादी
आझाद रोड, गुंदवली अंधेरी (पूर्व),मुंबई ६९

जन माहिती अधिकारी तथा असि.असेसर ॲन्ड कलेक्टर
बृहन्मंबई मनपा के/पूर्व विभाग कार्यालय,
आझाद रोड, गुंदवली अंधेरी (पूर्व),मुंबई ६९

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १८.२.२००९

सुनावणीचा दिनांक : ५.५.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास बेनार्ड गोन्साल्विस रोडच्या दोन्ही बाजूस असलेल्या सी.टी.एस.नं.१०७०/१०६६, मरोळ व्हिलेज येथे असलेल्या प्रॉपर्टीच्या बाबतीत असेसमेंट नंबर व असेसरची नावे ही माहिती पाहिजे होती. दि. २२ डिसेंबर २००८ रोजीच्या पत्राने असिस्टंट कमिशनर के/ई वॉर्ड यांनी संबंधित प्रॉपर्टीबाबत माहिती अर्जदारास दिलेली आहे. परंतू ती माहिती अर्जदारास मिळालेली नाही असे अर्जदाराने सुनावणीच्या वेळी सांगितले. त्यामुळे त्यांनी व्दितीय अपिल आयोगाकडे सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, असेसमेंटनं. किंवा असेसरचे नांव असले तर त्यांच्या विभागाकडून माहिती सुलभतेने दिली जऊ शकते. इथे अर्जदार बिल्डिंगची नांवे देतात. त्यावरुन माहिती काढणे जिकरीचे आहे. असेसमेंट नंबरवरुन असे दिसून येते की, अर्जदारास नेमकी जी माहिती पाहिजे आहे त्यासाठी थोडा प्रयत्न केला तर अर्जदारास हवी असलेली माहिती निश्चितपणे देता येईल, असे आयोगास वाटते. त्यामुळे दोन्ही पक्षाशी चर्चा करुन ही माहिती १० दिवसांत तयार करावी व अर्जदाराने स्वत: अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन दि.१५ मे २००९ पर्यत

**माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे निर्देश देण्यांत येत आहेत. सदर माहिती अर्जदारास विनामुल्य देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ५.मे २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२६७/०२

श्री.रवि नायर, अपिलार्थी
फ-४ सावळा चाळ,
चिमटपाडा, मरोळ नाका,
अंधेरी पूर्व मुंबई ४०० ०५९

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त
सहाय्यक मनपा आयुक्त, उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा आयुक्त कार्यालय,
के/पूर्व वॉर्ड, गोंदीवली, अंधेरी पूर्व मुंबई

जन माहिती अधिकारी तथा असि.असेसर ॲन्ड कलेक्टर
सहाय्यक मनपा आयुक्त,
बृहन्मुंबई मनपा आयुक्त कार्यालय,
के/पूर्व वॉर्ड, गोंदीवली, अंधेरी पूर्व मुंबई

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ९.३..२००९

सुनावणीचा दिनांक : ५.५.२००९

अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थी यांनी आयोगास सुनावणी पुढे ढकलावी असे पत्र दिलेले आहे. मात्र अत्यंत अपवादात्मक परिस्थिती असल्याशिवाय सुनावणी पुढे न ढकलण्याचे आयोगाचे धोरण असल्यामुळे व अपवादात्मक परिस्थिती नसल्याचे दिसून आल्याने अपिलार्थीची सुनावणी पुढे ढकलण्याचा अर्ज अमान्य करण्यांत आला. मात्र त्यांचा अपील मेमो विचारात घेण्यांत आला.

अर्जदारास चिमट पाडा येथे बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृहाबाबतच्या बांधकामाची माहिती पाहिजे होती ती अगोदर अर्जदारांना देण्यात आलेली आहे. या अर्जाच्या निमित्ताने त्या बांधकामाच्या संदर्भात पुढील माहिती पाहिजे होती.

महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये झोपडपट्टीची "व्याख्या" काय अशी माहिती पाहिजे आहे. कायदयाच्या प्रती सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे त्या अर्जदारांनी स्वतः कायदयाचे वाचन करुन घ्यावे हे म्हणणे योग्य वाटते. अर्जदाराचा दुसरा मुद्दा असा की, सी.टी.एस. नं.१६१३ च्या लगत जो भाग झोपडपट्टी म्हणून नमूद करण्यांत आला ते दर्शविणा-या गॅझेटच्या प्रती

**पाहिजे आहेत. त्या चिमटपाडा सी.टी.एस. सर्व्हे नंबर्स ज्याचा अंदाजित एरिया, झोपडपट्टी एरिया म्हणून घोषित करण्यांत आलेला आहे व ज्यात १६१३/१ ते ४ व त्या लगतचे अनेक सी.टी.एस. सर्व्हे नंबर नमूद केलेले आहेत त्या गॅझेटची प्रत दिलेली आहे. मात्र सर्वच गॅझेटच्या प्रती उपलब्ध नाहीत असे कळविलेले आहे. या उपरही माहिती हवी असल्यास अर्जदाराने या संदर्भातील उपलब्ध कागदपत्राची स्वतः पाहणी करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती ते प्राप्त करुन घेऊ शकतात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक ५.मे २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२७२/०२

श्री.सुरेश कृष्णा पालांडे — अपिलार्थी
दिंडोशी मनपा वसाहत वॉर्ड सी
रुम नं.२४०, ज, अरुण कुमार वैद्य मार्ग,
गोरगांव (पूर्व), मुंबई ६५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त
परिमंडळ-१२, शैलेंद्र नगर,दहिसर (पूर्व)
मुंबई ६८

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज, कांदिवली पूर्व
मुंबई १०१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : २० मार्च.२००९
सुनावणीचा दिनांक : ६.५.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने पी/उत्तर प्रभाग येथील दिंडोशी मनपा वसाहत, एस.आर.ए. योजनेबाबत लेखी तक्रार अर्ज दिला होता. त्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिंडोशी पोलिस ठाणे यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अर्जदारांना दि.५.११.२००८ रोजी दिली. आतापर्यत घेतलेल्या जाबजबाबाच्या प्रती दिलेल्या असून, अजून चौकशी पूर्ण झालेली नाही व चौकशी पूर्ण होताच कळविण्यांत येईल अशी माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्णयानुसार दि.२३.१.२००९ रोजी अतिरिक्त जाबजबाबाच्या प्रती सुध्दा अर्जदारास दिलेल्या आहेत. प्रस्तृत प्रकरणाबाबतची माहिती एस.आर.ए. संबंधीची असून अर्जदाराने याबाबत एस.आर.ए.कडे दाद मागावी असेही अर्जदारास कळविले होते.

सूनावणीच्या वेळी हया योजनेला एस.आर.ए. ने मंजूरी दिलेली नाही, मात्र या संदर्भात पोलिसाकडे जी तक्रार केलेली आहे तिची दखल घेऊन चौकशीला सुरुवात झालेली आहे. आतापर्यत केलेल्या चौकशी अहवाच्या प्रती सुध्दा अर्जदारास देण्यांत आलेल्या आहेत. उर्वरित माहिती ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ मे २००९

Sic /may 2009/ kjg

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१६०/०२

श्री.प्रमोद रामपाद शुक्ला तक्रारदार
आनंदाश्रम, माहिम रोड, पालघर
ता.पालघर जि.ठाणे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय,कोकण भवन,
नवी मुंबई.

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद, पालघर,
ता.पालघर, जि.ठाणे ४०१ ४०४

-विवेचन-

श्रीयुत प्रमोद शुक्ला यांनी दि.८.७.२००८ रोजी आयोगाकडे अर्ज करुन आयोगाने दि.१३.३.२००८ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशी तक्रार केलेली आहे. या आदेशात पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत आले होते :-

"अर्जदार रस्त्यावर झालेल्या अनधिकृत बांधकामविषयी तक्रार करीत आहेत. हा नगर विकासाच्या दृष्टीने महत्वाचा विषय असल्यामुळे मुख्य अधिकारी यांनी याबाबत त्वरीत लक्ष देऊन कार्यवाही करण्यांत येईल,असे सांगितले. "

वरील आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, म्हणून सदर तक्रार केलेली आहे. त्याची सुनावणी दि.७.५.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, वरीलप्रमाणे श्री.गणेश शर्मा व बाबुभाई पटेल हयांना कलम ५३ सह १५२ अन्वये नोटीस देण्यांत आलेली होती. परंतू नगर परिषदेने नोटीस दिल्यानंतर संबंधित रस्त्यावर श्री.गणेश शर्मा यांनी बांधकाम केलेले आहे ते काढलेले नाही. नगर परिषदेच्या विरुध्द पालघर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला होता व त्यावर न्यायालयाने "जैसे थे "चे आदेश दिलेले आहेत व सदरची बाब ही श्री.बाबुभाई पटेल यांचेशी निगडीत असल्यामुळे त्यानंतर या प्रकरणी कोणती कार्यवाही झालेली आहे, ही परिस्थती दि.८ मार्च २००८ रोजीच्या पत्राने कळविण्यांत आलेली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीतील माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे. तसेच नगर पारिषदेकडील पुढील कार्यवाही न्यायालयाचे आदेश होताच नगर परिषदेकडून

**करण्यांत येईल,असे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी दिले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

**-आदेश-**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ७.मे २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२८४/०२

श्री.वामन विष्णू चव्हाण — अपिलार्थी
से.घर क्र.१९५
रुम नं.२४०, ज, अरुण कुमार वैद्य मार्ग,
गोरगांव (पूर्व), मुंबई ६५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एनफ/उत्तर विभाग कार्यालय,
माटूंगा,मुंबई१९

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एनफ/उत्तर विभाग कार्यालय,
माटूंगा,मुंबई१९

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १५.४..२००९

सुनावणीचा दिनांक : ७.५.२००९

अपिलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास भूभाग क्र.७६/ई लोकोत्कर्ष वाचनालय आणि पान बिडी शॉप, शिवडी-वडाळा (३) स्किम-५७ बाबत महापालिकेने मंजूर केलेला प्रस्तावाबाबत माहिती मागितली होती. त्या कार्यालयाने हा रिक्त भूभाग सेक्रेटरी, लोकोत्कर्ष वाचनालय यांचे नांवे असून त्याची माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे. अभिलेख्याचे निरिक्षण करुन अर्जदारास हव्या असणा-या अभिलेख्याच्या प्रती विहित शुल्क भरुन उपलब्ध करुन द्याव्यात असेही प्रथम अपिलीय आदेशात नमूद करण्यांत आलेले आहे. अर्जदाराचे दिलेल्या माहितीने समाधान झाले नव्हते त्यांनी निरिक्षण करुन त्यांना हव्या असलेली माहिती त्यांनी प्राप्त करुन घेतलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ७.मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४७७/०२

श्री.गौतम संतोष पारेराव  अपिलार्थी
दै.युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय,
साकी रोड,धुळे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी
तहसील कार्यालय
धुळे  उत्तरवादी

-विवेचन-

श्री.गौतम संतोष पारेराव यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.३१.१.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे दोन स्वतंत्र व्दितीय अपीले सादर केली त्या अपिलाची सुनावणी दि.२८.४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी उपस्थित होते. परंतू जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित राहिले नाहीत.

अपिलार्थीनी दि.५.९.२००७ व २१.८.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून धान्य क्र.क्र.४६,४७,८२ व ७३ चे मूळ मालक यांच्या मंजूरीचे ठिकाण इ.मुद्यांवर माहिती मागविली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दोन पत्रे दिनांक २५.९.२००७ अन्वये काही माहिती पुरवून उर्वरित माहितीसाठी शुल्क भरण्याचे कळविले होते परंतू माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन दि.२६.११.२००७ रोजी दोन स्वतंत्र अपीले केली. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी दि.१०.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांची निवेदने सादर केली. सुनावणीच्या अनुषंगाने अपिलीय अधिकारी यांनी दि.८.१.२००८ रोजी अपिलार्थीनी माहितीसाठी आवश्यक पूर्ण शुल्क भरुन चलन जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावे व त्यानुसार माहिती उपलब्ध करणे किंवा अपिलकर्त्याने भरलेल्या रकमेमध्ये देऊ शकणारी माहिती अपिलकर्त्याने लेखी स्वरुपात मागणी केल्यावर तात्काळ उपलब्ध करण्याचे दोन स्वतंत्र आदेश पारीत केले असे असूनही माहिती पुरविली नाही असे नमूद करुन दि.३१.१.२००८ रोजी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले केली.

आयोगाकडील दोन्ही व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी उपस्थित होते. त्यांनी माहिती अपूर्ण व विलंबाने पुरविल्याचे नमूद केले तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे उपस्थित राहिले नसल्याने त्यांची बाजू समजू घेता आली नाही. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यांत आली. त्यावरुन असे दिसते की, आयोगाकडील अपिल क्र.४७७ व ४७८मध्ये तहसिल कार्यालयाकडून रेशन दुकान क्र.४६,४७,८२व ७३ च्या अनुषंगाने रॉकेल वितरणासंबंधी माहिती मागितली होती. रेशन कार्ड व वितरकांसंबंधी माहिती अपूर्ण मिळाली असल्याचे अपिलकर्त्यानी सांगितले. दोन्ही प्रकरणात उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १०

दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना पुरवावी किंवा अपिलार्थीना संबंधित कागदपत्राची तपासणी करण्यास परवानगी देऊन त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्राच्या प्रती उपलब्ध करावयात.

सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

दोन्ही अपिले निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ७.मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२७९/०२

श्री. उदय सदाशिव भिसे — अपिलार्थी
१०, दत्तराज हौसिंग सोसायटी, असल्फागाव,
लिंक रोड, घाटकोपर पश्चिम मुंबई -८४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता
अभियांत्रिकी विभाग,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा,
मुंबई ४०० ०५१ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
अभियांत्रिकी विभाग,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा,
मुंबई ४०० ०५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ३०.३..२००९
सुनावणीचा दिनांक : ६.५.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराला त्यांच्या दि.१९.११.२००८ रोजीच्या अर्जानुसार अंधेरी-घाटकोपर मेट्रो रेल प्रोजेक्ट, घाटकोपर (पश्चिम)असल्फा गाव येथील मॅप ८व ८अ मधील काही भागात सुरु असलेल्या नाल्याच्या कामासंबंधी तसेच नाल्याच्याबाजुला असलेल्या अतिक्रमणासंबंधी माहिती पाहिजे होती. अपिलार्थीस दि.१.१२.२००८ रोजी दिलेल्या माहितीने समाधान झालेले दिसत नाही. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेल्या नकाशाची व माहितीची तपासणी अर्जदारांना करण्यास देऊन त्यांना हव्या असेल्या माहितीच्या कागदपत्राच्या फोटोप्रती देणे हा उपाय होऊ शकतो. तेव्हा असे निर्देश देण्यांत येत आहेत की, दिनांक २९ मे २००९ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी २.०० वाजता उपस्थित रहावे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या माहिती अर्जासंबंधी सर्व माहिती तयार ठेवून तसेच अतिक्रमणाबाबत सुध्दा जे संबंधित अधिकारी असतील त्यांना सुध्दा त्यांची माहिती घेऊन उपस्थित राहण्यास सांगावे व अर्जदारास सर्व माहिती समजावून देऊन त्यांना आवश्यक असणा-या कागदपत्राच्या प्रती देण्यांत याव्यात. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ७.मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२६२/०२

श्री. चेतन कोठारी — अपिलार्थी
५२ ओशियानिक अपार्टमेंट
डॉ.राजबली पटेल लेन, बी देसाई रोड,
मुंबई २६

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयूक्त (प्रतिबंधक)
गु.शा. गुन्हे अन्वेषण विभाग,
छत्रपती शिवाजी मंडई २ रा मजला, एमआरए मार्ग,
मुंबई — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहायक
पोलिस आयुक्त (गुन्हे)पोलिस आयुक्त कार्यालय,
मुंबई -०१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १४.३..२००९
सुनावणीचा दिनांक : ५.५.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास दि.२६.११.२००८ रोजी मुंबईवर झालेल्या आतंकवादी हल्ल्यातील प्रमुख आरोपी श्री.मोहम्मद अजमल कसाब यांच्या विरुध्द दाखल करण्यांत आलेल्या एफ.आय.आर. व पंचनाम्याची प्रत तसेच त्याच्या विरुध्द दाखल करण्यांत आलेल्या चार्जशिटची माहिती पाहिजे होती. सदरील बाब ही आंतरराष्ट्रीय स्वरुपाची असून वैयक्तिक स्वरुपाची नाही. सदर प्रकरण न्यायालयात जरी गेले असले तरी तपासाचे काम अद्याप चालू आहे म्हणून ही माहिती देण्यास नकार देण्यांत आला व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या कलम ८ (१)(ज)चा हवाला देऊन सदरील माहिती नाकारलेली आहे त्याविरुध्दचे हे अपिल आहे.

अर्जदाराचे म्हणणे असे की, सदर आरोपीची चार्जशिट दाखल झालेली असल्यामुळे चार्जशिटची कॉपी त्यांना देण्यास हरकत नसावी असे आहे. सर्वसाधारणपणे गुन्हयाची चार्जशिट दाखल झाल्यानंतर चार्जशिट उपलब्ध करुन देण्याची जरी पध्दत असली तरी सदरील गुन्हयाचे गांभीर्य व त्याचे आंतरराष्ट्रीय स्वरुप लक्षात घेता, सदरील चार्जशिटची प्रत त्रयस्थ व्यक्तीस देणे योग्य राहिल किंवा नाही याबाबतचा निर्णय संबंधित न्यायालयाने घेणे योग्य राहिल. त्यामुळे त्रयस्थ व्यक्तिला चार्जशिटची प्रत देण्याबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयाकडून या विविक्षित केसमध्ये चारशिटची प्रत

द्यावी किंवा नाही, याबाबतचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत व त्या न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ७.मे २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४१९०/०२

श्री.आलोककुमार एन.सिंग — अपिलार्थी
रुम नं.३ प्लॉट नं.३, दत्तगुरु को.ऑप सोसयटी,
दत्तात्रय नगर गोळीबार रोड, घाटकोपर (प)
मुंबई ८६

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,एन विभाग, घाटकोपर पूर्व
मुंबई — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,एन विभाग, घाटकोपर पूर्व
मुंबई

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १२.२..२००९
सुनावणीचा दिनांक : १५.४.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थीस त्यांच्या दि.१३.१०.२००८ रोजीच्या अर्जानुसार अनुज्ञापन विभागातर्फे दि.१ जानेवारी २००८ ते दि.३० सप्टेंबर २००८ पर्यत पकडलेल्या मालाची रजिस्टरमधील नोंदीची छायाप्रत, पकडलेला माल किती लोकांनी सोडविला त्या रकमेच्या पावतीची छायाप्रत मिळण्याबाबत, पकडलेला माल व सोडविलेल्या मालाच्या कागदपत्राची पाहणी करण्याबाबत अर्ज केला होता. त्यास दि.११.११.२००८ रोजीच्या पत्राने प्रत्येक मुद्दयाच्या छायाप्रती करिता किती शुल्क होईल याची माहिती अर्जदारास कळविण्यांत आलेली आहे. विना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणा-यांचा माल पकडल्यानंतर नाशीवंत/अनाशीवंत मालाकरिता किती दंड केला जातो या मुद्दयाची माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे. तक्त्यात दर्शविलेली रक्कम व वसूल केलेली रक्कम यांत तफावत येत असल्यामुळे अर्जदाराने प्रथम अपिल केले होते. दि.१३.१.२००९ रोजीच्या प्रथम अपिलीय आदेशात तफावतीचे विश्लेषण अर्जदारास देण्यांत आलेले आहे.

व्दितीय अपिलामध्ये अर्जदाराचे म्हणणे असे की, प्रत्यक्ष किती विक्रेत्यानी किती रक्कमेचा माल सोडविलेला आहे त्या पावत्याची छायाप्रत मिळण्याबाबत माहिती मागितली होती. अर्जदारास दि.११.११.२००८ रोजीचे पत्र दिलेले आहे. त्यात प्रत्येक प्रतीस २/-रुपये प्रमाणे ४५० प्रतीकरिता ९०० रुपये भरण्याबाबत कळविण्यांत आलेले आहे. अर्जदाराचे समाधान करुन घेण्याच्या दृष्टीने अर्जदाराना वरील कालावधीत दंड भरुन माल सोडविला

त्या पावत्या तसेच न सोडवून नेलेल्या मालाबाबत करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबतचे कागदपत्र अर्जदारास दाखवावेत व ज्या कागदपत्राच्या प्रती त्यांना पाहिजे असतील त्या शुल्क भरुन त्यांना देण्यांत याव्यात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ७.मे २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२६६/०२

श्री.हरीबा महादेव चोपडे — अपिलार्थी
सावित्रीबाई माळीण चाळ, परीघ खाडी,
वसाहतएल.बी.एस.मार्ग, सुधाकर स्टोअर्सच्या मागे,
खो.नं.३, कुर्ला (प) मुंबई ७०

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयूक्त (प्रतिबंधक)
गु.शा. गुन्हे अन्वेषण विभाग,
छत्रपती शिवाजी मंडई २ रा मजला, एमआरए मार्ग,
मुंबई — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहायक
पोलिस आयुक्त (गुन्हे)पोलिस आयुक्त कार्यालय,
मुंबई -०१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १२.२..२००९

सुनावणीचा दिनांक : १५.४.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदार यांनी स.पो.प. क्र.२००२६साहेबराव राजाराम दिडवाघ यांनी सरकारी नोकरीचा गैरवापर केल्याची तक्रार केल्यानंतर झालेल्या चौकशीची सांक्षाकित प्रत मिळावी असा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत दि.२६.१२.२००८ रोजी दिलेला होता. त्या अर्जानुसार दि.१०.१.२००९ रोजी माहिती देत असताना जो अहवाल सहाय्यक पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा यांच्याकडून प्राप्त झाला होता त्याची प्रत देण्यांत आली आहे. त्या अहवालामध्ये अर्जदाराने केलेल्या सर्व अर्जाच्या तक्रारीचे स्वरुप एकच असून त्याची चौकशी झालेली आहे व सदर चौकशीत सदरहू प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याचे निष्पन्न झालेले असून, अर्जदार व्यथित असल्यास तयांचेकडून न्यायालयाकडे परस्पर दाद घेण्यांत यावी असे कळविण्यांत आलेले आहे. मात्र चौकशीचा अहवाल उघड करण्याबाबत नकार देताना कलम ८ (१) (छ)चा हवाला देण्यांत आलेला आहे. ही माहिती उघड केल्याने व्यक्तीचे जीवन शारिरीक सुरक्षितता धोक्यात येईल, असे नमूद करुन चौकशीचा अहवाल मात्र अर्जदारास नाकारण्यांत आला. अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१७.२.२००९ च्या आदेशात जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारण्याचे प्रयोजनाच्या निर्णयास सहमती दर्शविली म्हणून सदर अपिल सादर केलेले आहे. मुळ अर्जाच्या संदर्भात माहिती व अधिक स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे.

"अर्जदार श्री.हरिबा महादेव चोपडे, सावित्रीबाई माळीण चाळ खो.न.२, परिघवाडी वसाहत, एल.बी.एस.मार्ग, कुर्ला गार्डनजवळ,कुर्ला पश्चिम मुंबई यांनी गैरअर्जदार स.पो.फोजदार साहेबराव

दिडवाघ नेमणूक गुन्हे प्रतिबंधक शाखा, मुंबई यांच्या विरुध्द दि.९.७.२००८ व ७.११.२००८ रोजी केलेले तक्रार अर्ज मा.पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक) गुन्हे शाखा, मुंबई यांच्या मार्फतीने सहायक पोलिस आयुक्त (तांत्रिक विभाग)गुन्हे शाखा, मुंबई यांच्या कडे चौकशीकरिता प्राप्त झालेले होते. सदर चौकशीमध्ये अर्जदार हरिबा महादेव चोपडे हे सन १९९१ पासुन त्यांच्या राहत्या ठिकाणी राहत असून जी.पी.ओ. कार्यालयात पोस्टमेन या पदावर कार्यरत आहेत. तसेच गैरअर्जदार दिडवाघ यांच्या पत्नी माधुरी दिडवाघ यांनी सन १९९३ मध्ये एक खोली खरेदी केली असून त्या खोलीच्या दोन खोल्यामध्ये विभागणी करुन आपल्या मुलांच्या नावे केलेल्या आहेत. सदर खोलीत दुय्यम हि-यांना पैलू पाडण्याचा त्यांचा छोटा व्यवसाय असून त्यांची दोन मुले व इतर नातेवाईक सदर व्यवसाय करीत आहेत. या व्यवसायाचा म.न.पा. परवाना असून श्रीमती दिडवाघ या आयकर भरीत आहेत. तसेच गैरअर्जदार हे गुन्हे प्रतिबंधक शाखेत नेमणूकीस असल्याने त्यांच्या वर्तणूकीबाबत चौकशी करण्यांत आली असून ते नियमितपणे कार्यरत असल्याचा व त्यांची वर्तणूक चांगली असल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. गैरअर्जदार स.पो.फौजदार दिडवाघ हे केवळ पोलिस खात्यात कर्तव्यास असल्याने त्यांना शिक्षा व्हावी या अंतस्थ हेतुने त्यांना वेठीस धरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही व्हावी या हेतूने अर्जदार यांनी अर्ज केलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे कुर्ला पोलिस ठाणे येथे अर्जदार श्री.हरिबा महादेव चोपडे यांच्या विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७२ कलम १०७ अन्वये चॅप्टर केस दाखल केलेली असून (केस.नं.१५९/०८)त्यांना दि.२१.११.२००८ रोजी वैयक्तिक जात मुचलक्यावर रु.५००० भरुन मुक्त केलेले आहे."

अर्जदाराने केलेल्या अर्जास अनुसरुन जर अहवालात सदरील प्रकरण दिवाणी स्वरुपाचे आहे असा निष्कर्ष निघाला आहे. तरी तो अहवाल दिल्याने कोणाच्या सुरक्षिततेस धोका येईल हा प्रश्न अर्जदाराने उपस्थित केलेला आहे. कोणतीही कारणमीमांसा देत असताना केवळ अधिनियमातील तरतुदीचा उद्‌बोध करुन चालणार नाही तरी त्या संबंधी स्पष्टीकरण सुध्दा द्यावयास पाहिजे, जे अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दिलेले दिसत नाही. जरी अहवालाचा निष्कर्ष ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी देतात इतका सरळ आहे तर तो अहवाल द्यायला कुठल्याही प्रकारची अडचण येऊ नये. तेव्हा असे आदेश देण्यांत येत आहे की, अर्जदारास हव्या असणा-या अहवालाची प्रत १० दिवसात देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## -आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ७.मे २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४०७८/०२**

**श्री.प्रदीप एन सोनथालिया,** **अपिलार्थी**
**१० स्वाधीन सदन, सी रोड**
**मरीन ड्राईव्ह, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त (प्रतिबंधक)**
**गु.शा. गुन्हे अन्वेषण विभाग,**
**छत्रपती शिवाजी मंडई ३ रा मजला, एमआरए मार्ग,**
**मुंबई** **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक**
**पोलिस आयुक्त (गुन्हे)पोलिस आयुक्त कार्यालय,**
**मुंबई -०१**

**-विवेचन-**

अपीलकार श्री. प्रदीप एम.सोनथालिया यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.१२.२००८ रोजी अर्ज करुन सर्वश्री आर.बी.माने व प्रमोद दिनकर साईल यांनी दाखल केलेल्या दखलपात्र गुन्हयाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कक्ष, समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, गु.अ.वि. यांचेकडून अपीलकाराने मागितलेल्या माहिती संबंधी अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१,२ व ३ मध्ये दाखल झालेल्या गुन्हयापैकी काही गुन्हे तपासाधीन असून काही गुन्हयांची दोषारोपपत्रे मा.न्यायालयास सादर करण्यांत आली आहेत. ज्या माहितीमुळे अपराध्याचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे, त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियामध्ये अडथळा येईल, अशी माहिती उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (ज)अन्वये नाकारण्यांत आली. अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ अर्जदारास नेमके काय हवे आहे याचा बोध होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.३०.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपीलकार सुनावणीकरिता ठीक ११.२० वाजता हजर झाले. लगेचच २० मिनिटानी कोणालाही न सांगता निघुन गेले. अपीलकारास मुळ अर्जातील माहितीची आवश्यकता नसल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे त्या अर्थी त्यांनी माहितीची गरज आहे हे निश्चित. तेव्हा प्रथम अपीलिय अधिका-यांना असे निर्देश देण्यांत येतात की, त्यांनी अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाची हे आदेश मिळाल्यापून १ महिन्याच्या आत पुन्हा सुनावणी घ्यावी व गुणवत्तेवर अपीालावर निर्णय घ्यावा.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कारवाई करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक १३ मे २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४०७८/०२**

**श्री.प्रदीप एन सोनथालिया,** **अपिलार्थी**
**१० स्वाधीन सदन, सी रोड**
**मरीन ड्राईव्ह, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त (प्रतिबंधक)**
**गु.शा. गुन्हे अन्वेषण विभाग,**
**छत्रपती शिवाजी मंडई ३ रा मजला, एमआरए मार्ग,**
**मुंबई** **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक**
**पोलिस आयुक्त (गुन्हे)पोलिस आयुक्त कार्यालय,**
**मुंबई -०१**

**-विवेचन-**

अपीलकार श्री. प्रदीप एम.सोनथालिया यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.१२.२००८ रोजी अर्ज करुन सर्वश्री आर.बी.माने व प्रमोद दिनकर साईल यांची महाराष्ट्र पोलिस दलामध्ये नियुक्ती झाल्यापासून वार्षिक उत्पन्न व मालमत्ता किती आहे या संदर्भात अनुषंगीक माहिती मागितली.

त्रयस्थ पक्षीय माहिती असल्यामुळे श्री.माने व श्री.साईल यांची सदर प्रकरणी माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देणेबाबत संमती विचारली असता त्यांची सदर वैयक्तिक माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी हरकत घेतली असल्याने माहिती नाकारण्यांत येत असल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपीलकाराने त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक मालमत्तेविषयी माहिती मागितली आहे. संबंधीत अधिका-यांनी त्यांची वैयक्तिक मालमत्तेविषयीची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देण्यास हरकत घेतली आहे. त्यामुळे अपीलकारास मागणी केलेली माहिती, केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ (१)अन्वये जन माहिती अधिका-यांनी नाकारली आहे त्याचेसमर्थन करुन अपील फेटाळण्यांत आल्याबाबत आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.माने व श्री.साईल यांचे वार्षिक उत्पन्न व एकूण मालमत्तेबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अपीलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे. उक्त अधिनियमातील कलम ११ (१)अनुसार श्री.माने व श्री.साईल यांची संमती विचारली असता त्यांची वैयक्तिक मालमत्तेची माहिती अपीलकारास देण्यास हरकत घेतली असल्याने जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारली आहे. वैयक्तिक मालमत्तेचे विवरण उपलब्ध करुन देण्याबाबत मुंबई हायकोर्ट (नागपूर खंडपीठ)व दिल्ली हायकोर्ट येथे दाखल केल्या गेलेल्या रिट पिटीशनचा निर्णय हाती आल्यानंतर याबाबतचे चित्र स्पष्ट होईल. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (ख)(दहा)अनुसार प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना मिळणारे मासिक वेतनाबाबत माहिती प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, श्री.माने व श्री. साईल यांना कार्यालयामर्फत देण्यांत येणा-या मासिक/वार्षिक वेतनाबाबतची माहिती तसेच पोस्टींग बाबतची माहिती जनमाहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**-आदेश-**

**अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक १३.मे २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२९१/०२

श्री.मसूद एम.हुसेन — अपिलार्थी
१००१, १० वा मजला,रुबी टॉवर
सहकार रोड, जोगेश्वरी पश्चिम
मंबई ४०० १०२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा वित्त नियंत्रक
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबइ-५१ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबइ-५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १६.४.२००९
सुनावणीचा दिनांक : १४.५.२००९
अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास त्यांच्या दि.१६.२.२००९ रोजीच्या अर्जानुसार अंबर को-ऑप-हौसिंग सोसायटी (नियो)येथील प्रकल्पासाठी मे.अंबर एन्टरप्राइजेस या विकासकाने सादर केलेल्या भागीदारी करारनाम्याची प्रत देण्याची विनंती केली होती.

वरील कागदपत्र हे परिशिष्ट-३ मध्ये असल्यामुळे झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाच्या परिपत्रक २ (अ) दि.१३.११.१९९७ (परिशिष्ट-इ)अन्वये गोपनीय ठेवले जातात. त्यामुळे अर्जदारास ती माहिती देण्यांत आलेली नाही व हाच निर्णय दि.२६.३.२००९ रोजीच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशात कायम केला. अर्जदाराची मागणी नोंदणीकृत भागीदारी करारनाम्याच्या प्रतीची आहे. पण अंबर को-ऑप. हौ.सोसयटीचे परिशिष्ट-३ सोबत सादर केलेली दि.६.९.२००२ च्या भागीदारी करारनामा हा नोंदणीकृत नाही पण त्याची साधी कॉपी उपलब्ध आहे असे सुनावणीच्या वेळी सांगितले. आयोगाने परिशिष्ट-३ मध्ये विकासकाच्या वित्तिय बाबींची माहिती असल्याने ते देता येणार नाही असा निर्णय या अगोदर दिला असला तरी भागीदारी करारनाम्यात अर्जदाराचे म्हणणे तेही एक भागीदार दर्शविलेले आहेत. त्यामुळे अर्जदारास करारनाम्याची प्रत देण्यास हरकत नाही व ती जन माहिती अधिकारी यानी ७ दिवसाचे आंत अर्जदारास द्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १४.मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२९२/०२

डॉ.शंकर शिवप्पा पोळ, अपिलार्थी
४/५ स्वस्तिक, जे.जे.हॉस्पीटल कॅंपस
भायखळा, मुंबई ४००००८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षका
कामा व आल्बलेस रुग्णालये, महापालिका मार्ग,
मुंबई ४००००१ उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी
कामा व आल्बलेस रुग्णालये, महापालिका मार्ग,
मुंबई ४००००१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १३.४.२००९

सुनावणीचा दिनांक : १४.४.२००९

अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास दि.१.७.२००१ ते ८.७.२००३ या गैरहजेरीचा कालावधी नियमित करुन घेण्यासंबंधात असलेली सद्य:स्थितीची माहिती पाहिजे होती. अर्जदारास पुढीलप्रमाणे माहिती देण्यांत आलेली आहे:-

डॉ.शंकर पोळ क्ष-किरण शास्त्रज्ञ यांची सन १९८२ ते १९९३ मधील अर्धवेतनी रजेची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात नसल्यामुळे डॉ.पोळ हे उपरोक्त कालावधीत ज्या ठिकाणी कार्यरत होते. त्या त्या ठिकाणी संबंधीत रजेबाबतचा अहवाल पत्रे पाठवून त्यांच्या कडून या कार्यालयामार्फत मागविण्यांत आलेला होता त्या नुसार त्यांच्या सेवा पुस्तकात सदरील रजेच्या नोंदी घेण्यांत येऊन त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या त्यांच्या रजा दर्शविण्यांत आलेल्या आहेत. दि.१.७.२००१ ते दि. ८.७.२००३ या कालवधीत पर्यतची त्यांची गैरहजेरी नियमित झालेली नाही. त्यामुळे त्यांचे सदर कालावधीचे वेतन व भत्ते काढण्यांत आलेले नाही. परंतू त्यांचा दि.१.७.२००१ ते दि.८.७.२००३ पर्यतचा गैरहजर कालावधी नियमित करण्याबाबत माननीय संचालक, आरोग्य सेवा,मुंबई यांच्या कडे या कार्यालयाचे पत्र क्र.कावआरु/आस्था-१/डॉ.पोळ/१३०-३४/०९, दि.६.१.२००९ अन्वये प्रस्ताव सादर करण्यांत ओला होता. डॉ. पोळ, यांच्या गैरहजर कालवधीत नियमित करण्याबाबतचे आदेश संचालक, आरोग्य सेवा,मुंबई यांचेकडून प्रलंबित असून त्यांच्याकडून सदरील आदेश प्राप्त होताच डॉ.पोळ यांची सेवा नियमित करुन त्यांच्या सदर कालावधीचे वेतन व भत्ते काढण्यांत

**येऊन त्यांना वेतन अदा करण्यांत येईल. तसेच डॉ.पोळ यांचे दि.९.७.२००३ पासूनचे वेतन या कार्यालयामार्फत काढण्यांत आलेले आहे.**

**सुनावणीच्या वेळेला जो प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा यांनी दि.६.१.२००९ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. त्याची प्रत अर्जदारास देण्याचे निर्देश देण्यांत आलेले आहेत. सबब पुढील प्रमाणे आदेश देत आहे.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १४ मे २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२९४/०२

श्री.श्रीरंग एच.कुलकर्णी — अपिलार्थी
२ रा मजला, समाधान सदन, हनुमान रोड,
विलेपार्ले,पूर्व, मुंबई ४०००५७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त
सार्व.न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई
धर्मादाय भवन, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी मुंबई ४००००१ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षका
सार्व.न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई
धर्मादाय भवन, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी मुंबई ४००००१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १३.४.२००९
सुनावणीचा दिनांक : १४.५.२००९

अपिलार्थी अनुपस्थित तसेच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अर्जदाराला हनुमान रोड सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, विलेपार्ले यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीच्या बाबत माहिती पाहिजे होती. हया माहिती अर्जाबाबत कार्यवाही करावी असे आदेश अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेले आहेत. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, अर्जदारास सदरील तक्रारी विरुध्द अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही व चौकशी पूर्ण होताच अर्जदारास कळविण्यांत येईल, असे कळविण्यांत आले आहे. अपिलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये कागदपत्राची जशी परिस्थिती असेल त्याप्रमाणे माहिती द्यावयाची असते व ती दिल्याचे दिसून येते. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १४ मे २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपिल क्रमांक २००९/३०७१/०२
अपिल क्रमांक २००९/३१५०/०२
अपिल क्रमांक २००९/२७९१/०२
अपिल क्रमांक २००९/२७८९/०२
अपिल क्रमांक २००९/२७९०/०२
अपिल क्रमांक २००९/२७९२/०२

श्री.सुनिल म.वाखारकर — अपिलार्थी
ई-५/बी-००७,हायवे पार्क
ठाकूर संकुल कांदिवली पूर्व
मुंबई ४०० ०५७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपकुलसचिव
मुंबई विद्यापीठ डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुझ पूर्व — उत्तरवादी
मुंबई ४०००९८

जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक/परिक्षा नियंत्रक
मुंबई विद्यापीठ डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुझ पूर्व
मुंबई ४०००९८

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १३.४.२००९
सुनावणीचा दिनांक : १४.५.२००९

अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

दिनांक १.८.२००८ रोजीच्या आदेशाने वरील सर्व प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन आदेश पारित करावे, असे निर्देश दिलेले होते. अद्याप त्याचे पालन झालेले नाही, अशी तक्रार अर्जदाराने केलेली आहे. या अपिलाची सुनावणी दि.१४.५.२००९ रोजी घेण्यांत आली.

सुनावणीच्या वेळेला प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिघ्र प्रकृति अस्वास्थामुळे अपिलाची सुनावणी घेता आली नाही. मात्र अर्जदारास माहिती देण्यांत आलेली आहे असे सांगण्यांत आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या सर्व अपिलाची सुनावणी १५ दिवसांचे आत घेऊन त्यांचे आदेश पारित करावे, असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यांत आले.

अर्जदार हे मिठीबाई महाविद्यालयाचे एक निलंबित कर्मचारी आहेत. आतापर्यत अज्रदाराने १०० पेक्षा जास्त अर्ज विद्यापीठाकडे दिली असल्याचे विद्यापीठाच्या

**अधिका-यानी आयोगाच्या निदर्शनास आणले. अर्जाच्या संखेच्या बाबतीत विवके असावा व त्यांचे अर्ज हे अधिनियमाच्या चौकटीतील असतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे, असे अर्जदारास सांगण्यांत आले. सबब पुढीलप्रमाण आदेश देण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक १४ मे २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/३४९/०२

श्री.अवेझ हुसेन ट्रस्टी — तक्रारदार
ॲक्टीव्ह इंटेलिजन्स मुव्हमेंट
रु.न.२१ लेन अे-१ सेक्टर-१
चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई-८८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पालिका आयुक्त
मुंबई महानगरपालिका, एम पूर्व वॉर्ड
२ रा मजला खो क्र.२०१ शरद आर्चा मार्ग, — उत्तरवादी
चेंबूर (पूर्व) मुंबई ४०००७१

जन माहिती अधिकारी तथा फलोद्यान सहाय्यक
मुंबई महानगरपालिका, एम पूर्व वॉर्ड
२ रा मजला खो क्र.२०१ शरद आर्चा मार्ग,
चेंबूर (पूर्व) मुंबई ४०००७१

-विवेचन-

श्री.अवेझ हुसेन यांनी आयोगाकडे दि.८.३.२००९ रोजी त्यांच्या अर्जास योग्यतो प्रतिसाद न मिळाल्यामुळे तक्रार केलेली आहे. या तक्रारीची सुनावणी दि.१४.५.२००९ रोजी घेण्यांत त्या वेळेला तक्रारकर्ते अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता उपस्थित होते. अर्जदारास त्यांच्या दि.३.११.२००८ रोजीच्या अर्जान्वये चित्ता कॅम्प वॉर्ड क्र.१३५ येथील खेळाची मनोरंजनाची मैदाने या संबंधी माहिती पाहिजे होती. ही माहिती अर्जदारास दि.२५.११.२००८ रोजी देण्यांत आलेली आहे, असे दिसून आले. या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केलेले आहे :-

"अर्जदार श्री.अवेझ हुसेन यांनी दि.३.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, उद्यान विद्या सहाय्यक एम/पूर्व यांना माहिती अधिकाराचा अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन पत्र क्र.सआ/एम/पूर्व/७२०४२०१८०/सअ-१/उविस दि.२०.११.२००८ रोजी उत्तर दिलेले आहे. तद्नंतर अर्जदार श्री.अवेझ हुसेन जन माहिती अधिकारी उद्यान विद्या सहायक एम/पूर्व यांना भेटल्यानंतर संबंधित माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन पत्र क्र.सआ/एम/पूर्व/७२०७२०१८०/सअ-१/उविस दि.२३.१२.२००८ रोजी निर्देशित शुल्क अदा करुन आवश्यक ती माहिती कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यासंबंधी अर्जदारास कळविण्यांत आलेले होते. त्या अनुसरुन अर्जदाराने म.न.पा. कार्यालयात निर्देशित शुल्क भरल्यानंतर त्यांना या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.

मध्यंतरी अर्जदार श्री.अवेझ हुसेन यांनी त्यांच्या दि.१२.१२.२००८ च्या पत्रान्वये तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त एम/पूर्व यांना अपिल अर्ज सादर केलेला होता. सदर अपिल

अर्जास अनुसरुन तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त एम/पूर्व यांनी कार्यालयीन पत्र क्र.सआ/एम/पूर्व/४४/ओडी/तनिअ दि.१८.१२.२००८ रोजी पत्र पाठवून अर्जदारास दि.२४.१२.२००८ रोजी दु.३.०० वाजता सुनावणीस उपस्थित राहण्यास विनंती केलेली आहे. त्यानुसार सुनावणी होऊन त्यास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त एम/पूर्व यांनी अपिलकारास कार्यालयीन पत्र क्र.सआ/एम/पूर्व/७२०४५४१०९/तनिअ दि.२७.१२.२००८ रोजी लेखी उत्तर कळविलेले आहे आणि अर्जदाराचा अपिल अर्ज निकाली काढण्यांत आलेला आहे. अर्जदार श्री.अवेझ हुसेन यांनी दि.२७.१.२००९ रोजी उद्यान विद्या सहायक यांना पुनःश्च एक माहिती अधिकारांतर्गत अर्ज दाखल केला. त्यास अनुसरुन कार्यालयीन पत्र क्र.सआ/एम/पूर्व/७२०४८७५६६/सअ-१ दि.२५.४.२००९ अन्वये अर्जदारास या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती टपालाचा दाखला घेऊन निर्गमित केलेली आहे. अर्जदार श्री.अवेझ हुसेन यांनी त्यांच्या दि.४.३.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एम/पूर्व यांच्याकडे अर्ज सादर केला. त्यास अनुसरुन संबंधित अर्जदारास कार्यालयीन पत्र क्र.सआ/एम/पूर्व/७२०५१४९८२/का.अ. दि.३०.३.२००९ च्या पत्रान्वये दि.२.४.२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणीस उपस्थित राहण्यास विनंती करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस अर्जदार तसेच उद्यान विद्या सहाययक एम/पूर्व हे व्यक्तिशः उपस्थित होते. सदर सुनावणीत, अर्जदाराने त्यांच्या दि.२७.१.२००९ रोजीच्या माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जात नमूद केलेल्या अनु.क्र.१ अन्वये माहिती उपलब्ध करुन न दिलयाबद्दल नमूद केले आहे. अर्जदारास सदर विषयीची माहिती उद्यान अधिक्षक कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे अर्ज पाठविला आहे व ते माहिती देतील. आवश्यक वाटल्यास त्यांचेशी व्यक्तिशः संपर्क साधवा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कार्यालयीन पत्र क्र. क्र.सआ/एम/पूर्व/७२०५१४९८२/का.अ. दि.२३.४.२००९ अन्वये कळविण्यांत आले.

सदर सुनावणी आदेशामध्ये उद्यान अधिक्षक कार्यालयास संबंधित माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याविषयी कळविण्यांत आलेले आहे."

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, वरील माहितीसाठी अर्जदाराने नुकतेच शुल्क सुध्दा भरलेले आहे व त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यांत येत आहे. अर्जदार अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. मात्र उपलब्धतेप्रमाणे माहिती दिल्याचे दिसून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## -आदेश-

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १४ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/३८४७/०२

श्री.नवी एस.परब — तक्रारदार
१ ला मजला, मुळगांवकर इमारत
७ टोपीवाला लेन, लॅमिंग्टन रोड
मुंबई ४०० ००७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था-मुंबई-०१
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, डी-विभाग — उत्तरवादी
मुंबई यांचे कार्यालय, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ.समोर फोर्ट, मुंबई ०१

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था-मुंबई-०१
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, डी-विभाग
मुंबई यांचे कार्यालय, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ.समोर फोर्ट, मुंबई ०१

-विवेचन-

अपिलार्थी श्री.नविन एस.परब यांनी न्यू श्री.सागर सोसायटी अपार्टमेंट, वाळकेश्वर, मुंबई ४०० ००६ च्या अनुषंगाने मागविलेली माहिती जसे संस्थेच्या नोंदणी बाबतचा तपशिल, संस्थेच्या सदनिका मालकांचे नांव इ. माहिती जन माहिती अधिका-यांनी देण्याचे नाकारले. तसे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्यती सुनावणी न घेता व गुणवत्तेवर न पाहता प्रथम अपिल फेटाळले असल्याचे नमूद करुन दि.१७.११.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. आयोगाकडील व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२५.२.२००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.१४.७.२००८ च्या अर्जान्वये न्यू श्री. सागर सोसायटी/अपार्टमेंटचा नोंदणी बाबतचा तपशिल इत्यादि अ. ब. क व ड अशा चार मुद्दयांमध्ये नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१३.८.२००८ च्या पत्रान्वये मुद्दा क्र. अ च्या अनुषंगाने संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक अपिलार्थीना कळविला. मुद्दा क्र. ब व क बाबतची माहिती त्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचा भाग नसल्याने संस्थेकडून सदर माहिती प्राप्त करुन घेण्याचे कळविले. तसेच मुद्दा क्र. ड बाबत संस्थेचे इतिवृत्त कार्यालयाकडे सादर करण्याची तरतूद नसल्याचे कळविले असे असतानाही अपिलार्थीनी जन माहिती अधिका-यांना केलेला माहितीसाठीचा अर्जास ३० दिवस पूर्ण होण्यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन दि.८.८.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१४.१०.२००८ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असल्याचे नमूद करण्यांत आले आहे. अपिलार्थीनी त्यावेळी

लेखी निवेदन सादर करुन त्या व्यतिरिक्त काहीही म्हणावयाचे नसल्याचे तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीनी अपिलार्थीना दि.१३.८.२००८ रोजी उत्तर दिल्याचे सांगितले असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांच्या दि.२७.१०.२००८ च्या आदेशात नमूद केले आहे. तसेच जन माहिती अधिका-यांच्या स्तरावर उपलब्ध असलेली इतर माहिती अर्जदारांना दिल्याचे तसेच मागणी केलेली इतर माहिती जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जतन केली जात नाही असे नमूद करुन प्रथम अपिल फेटाळून त्याप्रमाणे दि.२७.१०.२००८ रोजी आदेश निर्गमित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीनी केलेल्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला उपस्थित असलेले अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली तसेच त्यांनी केलेली निवेदने, खुलासा व आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यांत आली. सहकारी गृह निर्माण संस्था हे स्वतःहून सार्वजनिक प्राधिकरण नाही. पण अर्जदाराचे संस्थेकडे असलेली माहिती त्यांचेकडूनच घ्यावी असे नमूद केले आहे व संस्थेला जी ती माहिती देण्याचे निर्देशहि दिले आहेत. हे योग्यच आहे. संस्थेने जर या निर्देशाचे पालन केले नाही तर अर्जदारास सहकारी कायद्यांतर्गत निबंधकाकडे तक्रार करता येईल व त्याची दखल निबंधक घेतील. सहकारी संस्थेची जी माहिती सहकारी कायद्यातंर्गत जन माहिती अधिकारी कार्यालयात आहे तेवढी देण्याची मात्र जबाबदारी यांची असते. त्यावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या दि.२७.१०.२००८ चे आदेश योग्य असल्याचे मत झाल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांच्या सदर आदेशास सहमती दर्शवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

## -आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १६ मे २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

अपिल क्रमांक २००९/५०२/०२

श्री.मिर्झा हुसेन बेग जाफर बेग — अपिलकर्ता
खिलाफत चौक, मन्यार मोहल्ला,
नंदूरबार

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सचिव
अलमीजान एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटी
मु.पो.नंदुरबार — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,धुळे

-विवेचन-

श्री. मिर्झा हुसेन बेग जाफर बेग यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.२२.५.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.२८.४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी उपस्थित होते. परंतू जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते.

अपिलार्थीनी दि.४.२.२००८ च्या अर्जान्वये ते संस्थेचे संस्थापक सभासद असून अपिलार्थीना संस्थेने दिलेल्या माहितीमध्ये त्यांचे कार्यकारीमध्ये नांव नसल्याने त्यांचे नांव कोणत्या फेरफार नंबरने व कोणत्या तारखेस कमी केली त्या सर्व कागदपत्रांची मागणी केली. परंतू सदर माहिती ३० दिवसांत मिळाली नाही असे नमूद करुन दि.१८.३.२००८रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगानेही माहिती न मिळाल्याने दि.२२.५.२००८ रोजी आयोगाकडे अपील अपील केले. तसेच अपिलीय अधिकारी तथा सहाययक धर्मादाय आयुक्त, धुळे विभाग,धुळे यांचे पत्र क्र.आस्था/८११/०८ दि.२१.४.२००८ नुसार अलमीजान एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर सोसायटीस दिलेले आदेश स्पष्ट आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४६०/०२

श्री.नारायण विठ्ठल कलाल — अपिलकर्ता
खिलाफत चौक, मन्यार मोहल्ला,
नंदूरबार

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी — उत्तरवादी
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय समाजकल्याण कार्यालय, जाती पडताळणी समिती,

-विवेचन-

श्री.नारायण विठ्ठल कलाल यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.२४.४.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपील सादर केली त्याची सुनावणी दि.२८.४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यांत आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.२७.११.२००७ च्या अर्जान्वये जात पडताळणी प्रमाणपत्र मिळणे कामी संपूर्ण कागदपत्रे पंचायत समिती, तळोदा या कार्यालयाने दि.२९.६.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविली असल्याने त्यानुसार प्रमाणपत्र दिले किंवा नाही, दिले असल्यास कोणास दिले व दिले नसल्यास कां दिले नाही, याबाबत माहिती मागविली होती. परंतू माहिती न मिळाल्याने नमूद करुन प्रथम अपील केले. तद्नंतरची सदर प्रमाणपत्र न मिळाल्याने आयोगाकडे व्दितीय अपिल केले ते दि.२४.४.२००८ रोजी प्राप्त झाले.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीच्या वेळेला उपस्थित राहिले नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. अपिलार्थीना जन माहिती अधिकारी यांनी माहिती विहित वेळेत दिली नाही. अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेऊन वेळीच योग्यते आदेश पारित केले नाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत अपिलार्थीना मागणी केलेली माहिती पुरविण्यांत यावी व तसे आयोगाला अवगत करावे.

तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती कां लादण्यांत येऊ नये? याचा खुलासा हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत आयोगाकडे करावा तेव्हा खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मे २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार**

**तक्रार क्रमांक २००९/२००/०२**

**श्रीमती.स्वाती द.वाव्हळ** **तक्रारदार**
**अ/६०३,दोस्ती मरक्यूरी,**
**शेख मिसरी रोड,**
**वडाळा,मुंबई -३७**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्राचार्य**
**एलफिन्स्टन महाविद्यालय,** **उत्तरवादी**
**१५६, महात्मा गांधी मार्ग,मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा रसायन शास्त्र (विभाग प्रमुख)**
**एलफिस्टन महाविद्यालय,**
**१५६, महात्मा गांधी रोड, मुंबई ४०० ०३२**

**-विवेचन-**

**श्रीमती स्वाती वाव्हळ यांनी दि.१६.८.२००८रोजी सादर केलेल्या अपिलाची आयोगाने अपिल क्र.२८८२ व्दारे अपिलाची सुनावणी घेऊन अर्जदाराला हवी असणारी माहिती बरीच असल्याने ती प्रयत्नपूर्वक १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले होते. ती माहिती न दिल्यामुळे श्रीमती वाव्हळ यांनी आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने दि.२३.१.२००९ रोजी त्यांना हवी असणारी माहिती मिळालेली आहे, त्यामुळे त्यांना तक्रार राहिलेली नाही असे आयोगास त्यांनी लेखी निवेदन दिलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

**-आदेश-**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८ मे २००९**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार**

**तक्रार क्रमांक २००९/२५३/०२**

**श्री.मंदार वैद्य** **तक्रारदार**
**युनियन बॅंक भवन**
**८वा मजला, २३९ विधान भवन मार्ग,**
**नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी**
**वरिष्ठ कार्मिक अधिकारी,**
**बृहन्मुंबई विद्युतपुरवठा व परिवहन उपक्रम मुंबई ०१**

**-विवेचन-**

**श्री. मंदार वैद्य दि.२३.४.२००८ रोजीच्या आदेशाने ' ब ' वर्ग टेक्नीकल अधिका-यांचे संदर्भात किती तास काम करावयाचे बाबतचे लेखी आदेश असल्यास त्याची प्रत अर्जदारास देण्यांत यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले होते. मात्र दिलेली माहितीची संगती लागत नाही, अशी तक्रार दि.१८.६.२००८ रोजी केल्यामुळे त्याची सुनावणी दि.१८.५.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्त्यास हव्या असणा-या प्रतीनिशी जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास आयोगाच्या आदेशानुसार दि.२८.५.२००८ रोजी ' ब ' वर्ग टेक्नीकल अधिका-यांना दर आठवडययाला कमाल ४८ तास काम करणे आवश्यक असते तर आवश्यकता भासली तर त्यापेक्षा अधिक काम करावे लागते. परंतू त्यासाठी मोबदला दिला जातो व त्यांच्या दैनंदिन कामाचे तास हे त्या कामकाजावर आधारित असतात, अशी माहिती दिलेली होती.**

**सुनावणीच्या वेळेला वरिष्ठ कार्मिक अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहेः-**

**" या अनुषंगाने येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, कामाच्या तासासंबंधीचा हा मुद्दा उपक्रम कार्यरत असताना बेस्ट इंजिनिअर्स असोसिएशनने प्रशासनाकडे उपस्थित केला होता. त्यावर झालेल्या सभेमध्ये साधकबाधक चर्चा करण्यांत आली. त्यानंतर हा मुद्दा दप्तरीदाखल करण्यांत आला.**

**या पूर्वीही अर्जदार श्री. मंदार वैद्य तसेच श्री.व्ही.पी.गवांदे यांनी याच विषयावर राज्य माहिती अधिकार अंतर्गत विचारणा केलेली आहे. त्यांना पाठविलेल्या पत्राच्या प्रती सोबत जोडण्यांत येत आहेत.**

**तसेच या संदर्भात उपक्रमातील अधिका-यांच्या कामाच्या वेळेबाबत काढण्यांत आलेल्या कार्यालयीन आदेशाच्या प्रती व सेवाशर्तीच्या प्रती सोबत जोडण्यांत येत आहेत. "**

**वरील विवेचनावरुन जसे धोरण स्विकारण्यांत आलेले आहे त्यासंबंधीची संपूर्ण माहिती अर्जदारास दिलेली आहे असे आयोगाचे मत झालेले आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**तक्रार अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक १८ मे २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४९१/०२**

**श्री.शांतीलाल मंगा चौधरी** **अपिलकर्ता**
**रा.सोनगीर ता.जि.धुळे ४२४३०९**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.पोलिस निरिक्षक** **उत्तरवादी**
**सोनगीर पोलिस स्टेशन सोनगीर,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी पोलिस अधिक्षक**
**सोनगीर पोलिस स्टेशन सोनगीर,जि.धुळे**

**-विवेचन-**

**श्री. शांतीलाल मंगा चौधरी यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.३०.५.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपील केले. त्याची सुनावणी दि.२८.४.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थीनी दि.३०.४.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.१०.३.२००८ रोजी सहाय्यक पोलिस निरिक्षक, सोनगीर पोलिस स्टेशन यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विशेष पोलिस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी दि.२६.३.२००८ च्या पत्रान्वये चौकशीचे आदेश दिले. त्या अनुषंगाने उपविभागीय पोलिस अधिकारी, साक्री यांनी सोनगीर पोलिस स्टेशनला दिलेल्या पत्राची छायांकित प्रत व त्यावर करण्यांत आलेल्या खुलाशाची प्रत कलम ७ अन्वये ४८ तासात उपलब्ध करण्याची मागणी केली होती. परंतू सहा.पोलिस निरिक्षक, सोनगीर पोलिस स्टेशनयांनी त्यांच्या दि.२.५.२००८ च्या पत्रान्वये चौकशी चालू असल्याने चौकशी पूर्ण झाल्यावर कागदपत्राची मागणी करण्याचे अपिलार्थीना कळविले. माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि.१६.५.२००८ रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने दि.१०.६.२००८रोजी माहिती दिल्याचे निदर्शनास आणले. तत्पूर्वी दि.३०.५.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले. त्यामध्ये प्रामुख्याने ४८ तासात माहिती दिली नाही. त्यांच्या जीवन स्वातत्र्यांचा प्रश्न होता, माहिती न मिळाल्याने दि.२.५.२००८ व २६.५.२००८ च्या शासकिय कामात वापर करता येऊ न शकल्याने प्रचंड नुकसान झाल्याचे नमूद केले आहे.**

**आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला अधिनियमाच्या कलम ७ अन्वये अपिलार्थीच्या जीवन स्वातंत्र्यांचा संबंध असताना ४८ तासात माहिती दिली नाही. सबब कर्तव्यात कसूर केल्याने सहायक जन माहिती अधिकारी, सोनगीर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. तर अधिका-यानी अपिलार्थीना माहिती दिल्याने अपिल निकालात काढण्याचे व यापुढे सर्व संबंधितांना माहिती पुरविण्याची दक्षता घेत असल्याचे नमूद केले आहे.**

**आयोगाकडील सुनावणी व आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची अवलोकन करता वास्तविक सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.४.२००८चा माहितीचा अर्ज त्वरीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत करावयास हवा होता. परंतू तसे या प्रकरणात झाले नाही. अपेक्षित माहिती अपिलार्थीना दि.२.५.२००८ व दि.२६.५.२००८ रोजी अपिलार्थीनी केलेल्या तक्रारी**

संदर्भात चौकशीकामी आवश्यक होती, असे असले तरी मागणी केलेली माहिती चौकशीकामी उपयुक्त असल्याची शक्यता असली तरी व्यक्ती स्वातंत्र्य संबंधात असल्याचे आयोगास वाटत नाही. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याची शिफारस करणे आयोगाला उचित वाटत नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/३५३/०२

श्री.तुळशीराम ना.मोरे — तक्रारकर्ता
रु.नं.३ चाळ क्र.२
पांजरपोळ गौतमनगर दिनकवारी रोड,
मुंबई ४०००८८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी — उत्तरवादी
उपनियंत्रक(शिधावाटप)
उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय इ परिमंडळ
चंचल स्मृती १ला मजला ग.द.आंबेकर मार्ग,
वडाळा,मुंबई ४०० ०३१

-विवेचन-

अर्जदार श्री. मोरे यांना जन माहिती अधिकारी तथा उपनियंत्रक, शिधावाट, (परिमंडळ 'इ' कार्यालय) मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारात माहितीची मागणी केली. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी व अपूरी माहिती पाठविली, असे कारण दर्शवून त्यांनी अपिलीय प्राधिकारी, उपनियंत्रक शिधावाटप यांचे कडे अपिल दाखल केले. तथापि प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदर प्रकरणाकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले, अशी तक्रार अर्जदाराने उक्त अर्जान्वये दि.१५.१२.२००७ रोजी आयोगाकडे केली आहे.

वरील तक्रारीची सुनावणी दि.१९.५.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळेला तक्रारकर्ते श्री. मोरे व अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपसिथत होते.

अपिलकर्त्याच्या दि.५.९.२००७ रोजीच्या अर्जाला मुद्दा क्र.५,६ व ७ वरील माहिती दि.११.१०.२००७ रोजीच्या पत्राने देण्यांत आलेली आहे. मुद्दा क्र.१ ते ५ बाबतची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविण्यांत आलेले आहे. मात्र ती माहिती ही अर्जदाराने शिधावाटप कार्यालयाला दि.२२.१०.२००८रोजी अर्ज करुन प्राप्त करुन घेतलेली आहे असे दिसून आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती त्या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविण्यापेक्षा त्या कार्यालयात ती माहिती उपलब्ध आहे त्या कार्यालयाकडे अर्जदाराच्या अर्जाची प्रत पाठवून मुद्दा क्र.१ ते ४ मुद्दयावर त्या कार्यालयाने माहिती द्यावी, असे लिहिले असते तर ते कायदेशीर सुसंगत राहिले असते याची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी. अपिलाच्या बाबतीत अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

श्री. तुळशीराम नारायण मोरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अ.शि.वा.दु.४४-ई २३ शिधावाटप दुकानाच्या वितरण व्यवस्थेबाबत व शिधापत्रिकाधारकांबाबत ई परिमंडळ कार्यालयात अर्ज केला होता. परंतू त्यांना देण्यांत आलेली माहिती सविस्तर नसून असमाधानकारक असल्याचे कारण नमूद करुन त्यांनी दि.३.११.२००७ रोजी माहिती अधिकारांतर्गत अपिल अर्ज दाखल केला.

सदर अपिल अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.११.२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणी मुक्रर करण्यांत आली असा सदर दिवशी अपिलीय अधिकारी श्री.एस.बी.झावरे ई परिमंडळ यांना निवडणूक

कार्यालयात तातडीचे काम निघाल्यामुळे सदर सुनावणी दि.१.१२.२००७ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यांत येईल अशी अपिलकारास पूर्व कल्पना दिली असता अपिलकार सदर दिवशी अनुपस्थित होते. त्यामुळे पुढील सुनावणी दि.६.१२.२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता मुक्रर करण्यांत आल्याबाबतअपिलकारास पत्र निर्गमित करण्यांत आले.

सदर दि.६.१२.२००७ रोजीची सुनावणी नोटीस शि.का.क्र.४४-ई मार्फत बजावली असता अपिलकाराने ती घेण्यास नकार दिला म्हणून शिधावाटप अधिकारी, शि.का.क्र.४४-ई यांनी पंचनामा करुन सदर नोटीस त्यांच्या घरावर चिटकवली.

दि.६.१२.२००७ रोजीच्या सुनावणी अपिलकार श्री.तुळशीराम मोरे हे अनुपस्थित राहिले तेव्हा अपिलकाराने अर्जात मागितलेली मुद्दा क्र.१,२,६ मधील माहिती ई परिमंडळ कार्यालयाच्या स्तरावर उपलब्ध नसल्याने सदर माहिती शि.का.क्र.४४-ई यांच्या कार्यालयीन स्तरावर उपलब्ध असून संबंधित माहिती शिधावाटप अधिकारी. शि.का.क्र.४४-ई यांचेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत अपिल निर्णय आदेश क्र.ईप/दुकान/०७/ममाअ/कवि.१६/जा.५३५४, दि.१२.१२.२००७ नुसार देण्यांत आले आहेत.

सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने शिधावाटप दुकानादाराकडे खंडणी मागणी केली व ती न दिल्यामुळे शिधावाटप दुकानदाराविरुध्द तक्रार करीत असतात व माहिती अधिकारांतर्गत संबंधित खात्याकडे माहिती मागत असतात असे सांगण्यांत आले. तसेच या संबंधी पोलिस स्टेशनकडे तक्रार करण्यांत आलेली आहे, असे सांगण्यांत आले. माहितीच्या अधिकारामध्ये मागितलेली माहिती देय आहे किंवा नाही हे पाहिले जाते. पोलिस तक्रारीच्या बाबत सक्षम प्राधिकारी योग्यतो निर्णय घेतीलच. सर्व कागदपत्राचे वाचन केले असता दोन्ही बाजूचे म्हणणे समजून घेतल्यानंतर अर्जदारास सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे व अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय मुदतीच देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र अर्जदार उपस्थित न राहिल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली असे दिसून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १९ मे २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४३४३/०२**
**अपिल क्रमांक २००९/४३४४/०२**
**अपिल क्रमांक २००९/४३४५/०२**
**अपिल क्रमांक २००९/४३४६/०२**
**अपिल क्रमांक २००९/४३४७/०२**
**अपिल क्रमांक २००९/४३४८/०२**

**श्री.भारत विरचंदजी गुर्जर** **अपिलकर्ता**
**७, गझदर स्ट्रीट, श्रीजी भवन**
**जे.एस.एस.रोड,मुंबई ०२**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता (दक्षिण)**
**एम.बी.आर ॲन्ड आर बोर्ड रजनी महल, ताडदेव मुंबई ३४**

**जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता सी ३/४** **उत्तरवादी**
**डिव्हिजन एम.बी.आर आणि आर बोर्ड चंदनवाडी, मुंबई २**

**-विवेचन-**

श्री.भारत विरचंदजी गुर्जर यांनी आयोगाकडे केलेल्या ६ ही अपिलाची सुनावणी दि.२१ मे २००९ रोजी ठेवण्यांत आली होती. मात्र दि.१९ मे २००९ रोजीच्या पत्राने अपिलकर्ते श्री. गुर्जर यांनी आयोगास असे कळविले आहे की, त्यांना हवी असणारी सर्व माहिती त्यांना विना शुल्क मिळालेली आहे आणि त्याने त्यांचे समाधान झालेले असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेली ६ ही अपिले मागे घेतलेली आहेत,असे आयोगास कळविले आहे व त्यास परवानगी मागितली आहे ती देण्यांत येत आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

**-आदेश-**

**६ ही अपिले निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१ मे २००९**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपिल क्रमांक २००९/४३४२/०२

श्री.डॉ.गिरीष संघवी — अपिलकर्ता
३, कृष्णा इमारत, ३४ खेतवाडी,
६ वी गल्ली, मुंबई ४००००४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य — उत्तरवादी
अभियंता, बेस्ट, बेस्टभवन, बेस्ट मार्ग,
पोस्ट बॉक्स नं. १९२, मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकार विभागीय अभियंता
बेस्ट, ३ रा मजला, विद्युत इमारत पाठकवाडी,
जी.टी. हॉस्पीटल समोर, मुंबई ४००० ०२

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ८.४.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.५.२००९

अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अर्जदाराच्या दि.१५.१०.२००८ रोजीच्या अर्जामध्ये त्यांना दि.२.१०.२००८ व दि.१२.९.२००८ रोजी जी पत्रे पाठविली होत्या त्या पत्रात २ मीटरचा १ मिटर करण्यासंबंधीची त्यांची जी तक्रार आहे त्या संबंधीची माहिती मागितलेली आहे.

सदर माहिती त्यांना दि.१४.११.२००८ रोजीच्या पत्राने देण्यांत आली त्यांने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी दि.२.१२.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले की, या अपिलाच्या संदर्भात बेस्टच्या २ कर्मचा-यांनी सुध्दा अपिलकर्त्याच्या तक्रारीच्या बाबत दि.१३.४.२००९ ला चर्चा केलेली आहे व त्यांनी दि.१३.५.२००९ रोजी उर्वरित माहिती दिलेली आहे. या दरम्यान अर्जदाराने आयोगाकडे दि.८.४.२००९ रोजी अपिल दाखल केले त्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी असे दिसून आले की, अर्जदाराचा अर्ज करण्यामागचा उद्देश्य हा की, त्यांच्या तक्रारीचे निवारण व्हावे असा आहे. त्यांच्या विज देयकामध्ये आकारण्यांत आलेल्या फिक्सड् चार्ज हा काही कालावधीकरिता जास्त लावलेला आहे तो परत मिळावा अशी मागणी आहे.

सुनावणीच्या वेळी याबाबत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबतचा संपूर्ण तपशिल तपासून फिक्सड् चार्ज जास्त वसूल केली असल्यास परत करण्यांत येईल व योग्यती कार्यवाही करण्यांत येईल. याबाबत अपिलार्थीना सुध्दा कळविण्यांत येईल, असे निवेदन आयोगास दिलेले आहे. त्यामुळे माहिती व कार्यवाहीची हमी सुध्दा अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २१ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३५४/०२

श्री.वसंत सिताराम भालेराव — अपिलकर्ता
२८०/६५९८, पंतनगर साईनाथ को.हॉ.सो.
समता कॉलनी, पंतनगर, घाटकोपर (पूर्व)
मुंबई ४०० ०७५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त — उत्तरवादी
परिमंडळ-६, ४ था मजला,
प्रशासकिय इमारत, आर.सी.मार्ग,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१

जन माहिती अधिकार तथा सहा.पोलिस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,
चेंबूर. मुंबई ४०० ०७१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १३.४.२००९
सुनावणीचा दिनांक : २८.५.२००९

अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपिलार्थी श्री.वसंत भालेराव यांनी दि.३१.८.२००८ व दि.९.१०.२००८ रोजी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, पंतनगर घाटकोपर (पूर्व),मुंबई ४०० ०७५यांचेकडे दोन तक्रार अर्ज दिलेले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती पाहिजे होती. जन माहिती अधिकारी यांनी याबाबत अजूनही तपास चालू आहे म्हणून त्यावेळी माहिती दिली नव्हती. तद्नंतर अपिलीय अधिकारी यांनी सद्य:स्थितीची संपूर्ण माहिती देण्यांत यावी, असे निर्देश दि.१९.१.२००९ रोजीच्या आदेशाने दिल्यानंतर अर्जदारास माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी पुढील निवेदन सादर केलेले आहे.

" अपिलकार यांनी अशाच प्रकारचा तक्रार अर्ज दि.९.१०.२००८ रोजी स्थानिक रहिवाशांच्या स्वाक्षरीसह केला होता. नमूद तक्रारअर्जाच्या चौकशीकामी चौकशी अधिकारी स.पो.नि.शंकपाळ यांनी घटनास्थळी वेळोवेळी भेटी दिल्या असता, अपिलकाराने तक्रार अर्जात नमूद केल्यानुसार तेथे दारु, जुगार, अनैतिक व समाजविघातक कृत्ये दिसून आली नाही. तसेच या व्यतिरिक्त उर्वरीत तक्रारी या दिवाणी स्वरुपाच्या असून सदरबाबत अपिलकारांच्या वतीने दाखल करण्यांत आलेले प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याबाबत चोकशी अधिकारी स.पो.नि.शंकपाळ यांनी माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील चौकशी अधिका-यांनी अपिलकारांच्या दि.३१.८.२००८ व दि.९.१०.२००८ च्या तक्रार अर्जा ास अनुसरुन उपरोक्त प्रमाणे कारवाई केलेली असून केलेल्या कारवाईबाबत सविस्तर माहिती अपिलकारांना विहित मुदतीत पुरविण्यांत आलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यांत आली आहे, असे अपिलकारांचे म्हणणे योग्य होणार नाही. तसेच अर्जदार यांना पुरविण्यांत आलेली माहिती ही उपलब्ध अभिलेखावरुन पुरविण्यांत आली असल्यामुळे ती चुकीची व दिशाभूल करणारी असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही."

**दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रत्यक्ष भेटी देऊन त्या संबंधी असलेली सर्व माहिती देण्यांत आलेली आहे, असेच दिसून आले. अर्जदाराची तक्रार कारवाईबद्दल असू शकते. परंतू त्याबाबतीत पोलिस विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांकडे तक्रार दाखल करणे इष्ट राहिल. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८ मे २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३५७/०२
अपिल क्रमांक २००९/४३५८/०२
अपिल क्रमांक २००९/४३५९/०२
अपिल क्रमांक २००९/४३६०/०२

श्री. धनसुख शिवा परमार — अपिलकर्ता
५२-बी, धारावी कुंभारवाडा,
६० फूट रोड, संत गोरा कुंभार रोड जवळ,
मुंबई ४०० ०१७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता (डीआरपी) — उत्तरवादी
झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण (एसआरए)
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
बांद्रा (पूर्व)मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकार तथा उप अभियंता (डीआरए)
झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण (एसआरए)
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
बांद्रा (पूर्व)मुंबई ४०० ०५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १९.९.२००८
सुनावणीचा दिनांक : २८.५.२००९

अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

वरील चारही अपिलाबाबत अपिलार्थी यांनी धारावी विभागातील कुंभारवाडा परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात असलेले जी.आर. नोटीफिकेशन, निकाल(judegment)वगैरेची माहिती पाहिजे आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प या विभागाकडे असलेल्या नोटीफिकेशन शासनाचे हया अर्जदारास देण्यांत आलेले आहेत. कुंभारवाडा विकासाच्या संदर्भात हायकोर्ट/सुप्रिम कोर्ट इत्यादिंनी दिलेल्या निर्णयाची माहिती सुध्दा अर्जदाराकडे आहे. या व्यतिरिक्त जी अजुनही धारावी पुनर्वसन प्रकल्पाबाबतचे या व्यतिरिक्त अर्जदार त्यांना हव्या असणा-या प्रकल्पाच्या कागदपत्राची तपासणी त्या कार्यालयात जाऊन ते करुन घेऊ शकतात. प्रकल्पाच्या यशस्वीतेच्या दृष्टीने त्या प्रकल्पाबाबतची आवश्यक असलेली माहिती अर्जदारास तत्परतेने देण्यांत येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. अर्जदाराने हवेतर या कार्यालयास भेट देऊन त्यांना हव्या असणा-या कागदपत्राची पाहणी केल्यास त्यांना हव्या असणा-या असणा-या कागदपत्रांच्या प्रती देण्यांत येतील, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

चारही अपिले निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २८ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३६६/०२

श्री. कल्पना वसंत शाह — अपिलकर्ता
ओभान निवास, एन.एस.रोड,
नवभारत शाळेच्या बाजुला मुलूंड (प)
मुंबई ४०० ०१७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त — उत्तरवादी
सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, टी विभाग
लालादेवी दयाळ मार्ग, मुलूंड (प), मुंबई ८०

जन माहिती अधिकार तथा उप जलअभियंता
सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, टी विभाग
लालादेवी दयाळ मार्ग, मुलूंड (प), मुंबई ८०

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १८.४.२००९
सुनावणीचा दिनांक : २९.५.२००९

अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अर्जदारास भांडूप येथील अतुल ग्रेन स्टोअर्स विभागातील दुकानाबाबत १९८७ ते २००३ या कालावधीचे ॲग्रीमेंटचे कागदपत्र पाहिजे होते.

उपरोक्त कालावधीमधील उपलब्ध असलेल्या १९८७-२००३ या कालावधीचे ॲग्रीमेंटच्या प्रती अर्जदारास पुरविण्यांत आल्या आहेत.

दिनांक २९.११.२००८ रोजीचा मुळ माहिती अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.१२.२००८ रोजी उत्तर पाठविलेले आहे. प्रथम अपिलीय आदेशात दि.१३.३.२००९ रोजी ॲग्रीमेंटच्या प्रती देण्याचे आदेश दिलेले आहेत व ती माहिती त्यांना दि.२९.३.२००९ रोजी विनामुल्य देण्यांत आलेली आहे.

अर्जदाराने दुसरा एक अर्ज दि.१६.१०.२००८ रोजी सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यालयाला दिलेला होता व भांडूप येथील अतुल ग्रेन स्टोअर्स या दुकानाचे सन १९९२ ते २००३ या कालावधीतील दुकानाच्या मालकाच्या नावाची विचारणा केली होती त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी, वरिष्ठ निरिक्षक, (दुकाने /आस्थापना) " टी " यांनी दि.२४.१०२००८ रोजी अर्जदारास कळविली होती व दुकानाच्या ४ मालकापैकी तीन नांवे नविन अभिलेख्यानुसार कमी करण्यांत आली आहेत. ही नांवे कशी कमी झाली, याबाबतचे कागदपत्र महापालिका जन माहिती अधिकारी यांचेकडे नसल्यामुळे त्यांनी सध्याचे दुकान मालक श्री.निलेश शहा यांना पत्र पाठवून त्यांनी इतर दुकानदाराची नावे कमी करण्यासाठी कार्यालयास दिलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती मागवून घेतल्या व दि.१६ ऑगस्ट २००१ रोजी डीड ऑफ डिझोल्यूशन च्या अन्वये अर्जदाराचे मयत पती श्री. वसंत शहा यांना पार्टनर शिप मधुन त्यांचे नांव कमी करण्याची संमती दिली होती, असे नमूद केलेले आहे. त्या डीड ऑफ रेग्युलेशन

नुसार श्री.वसंत शहा यांचे नाव नसल्याने ते कमी झालेले दिसते. अपिलार्थी यांनी डीड ऑफ डिझोल्यूशन संदर्भात महापालिका आयुक्त यांच्याकडे तक्रार करावी असे सुचविण्यांत आले. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ मे २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४३६७/०२**

**श्री. मनोहर साधु ठोंबरे** **अपिलकर्ता**
**कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग**
**कार्यासन जसनि,मंत्रालय,मुंबई ३२**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव** **उत्तरवादी**
**सामान्य प्रशासन विभाग कार्यासन -१४**
**मंत्रालय,मुंबई ३२**
**जन माहिती अधिकार तथा कक्ष अधिकारी**
**सामान्य प्रशासन विभाग कार्यासन -१४**
**मंत्रालय,मुंबई ३२**

**-विवेचन-**

**अपिलाचा दिनांक : ८.४.२००९**
**सुनावणीचा दिनांक : २९.५.२००९**

**अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

**अर्जदाराचे अपिलातील मुद्दे व त्याचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-**

**अपिलातील मुद्दा - अवर सचिव पदावर तात्पुरत्या स्वरुपात ज्या पदोन्नत्या सन २००८ च्या पदोन्नती सुचीवर देण्यांत आल्या आहेत त्या शासन निर्णयाशी/आदेशाशी संबंधित टिप्पणीच्या प्रती, विभागीय पदोन्नती समितीच्या बेठकीच्या अंतिम कार्यवृत्ताची प्रत व अन्य संबंधित कागदपत्राच्या प्रती अधिनियमातील कलम ८(१) (ञ) च्या परन्तुकानुसार मी मागविलेली माहिती विधी मंडळ/संसदेल नकार देतायेणार नाही. यामुळेच ही माहिती मिळावी.**

**अभिप्राय - अर्जदाराने मागणी केलेली कागदपत्रे ही अवर सचिव पदावरील पदोन्नतीसाठी तयार केलेलया सन २००८ च्या निवडसूचीची आहेत. सदर निवड सूचीवरील सर्व अधिका-यांना अद्याप पदोन्नत्या देण्यांत आलेल्या नाहीत. तसेच सदर नस्तीवर काही प्रकरणे खुली ठेवण्यांत आली आहेत. त्यावर अधिका-यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी आहे. त्यावर वि.प.स.चे अंतिम निर्णय होणे बाकी आहे. त्यामुळे कलम ८ (१) (ञ)नुसार सदर कागदपत्रे उपलब्ध करुन देता येणार नाहीत. हे माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला त्यांच्या अर्जाच्या संदर्भात दिलेले उत्तर योग्य आहे. तथापि याबाबत अर्जदाराला व्यक्तिशः बाजू मांडण्यासाठी अपिलीय प्राधिका-यांच्या दि.९.३.२००९ पत्राव्दारे दूरध्वनीवरुन संपर्क साधून दि.१७ मार्च २००९ पर्यत कार्यालयीन वेळेत अपीलीय प्राधिका-यांच्या दालनात उपस्थित राहण्याचे कळविले होते. परंतू सदर सुनावणीस अर्जदार उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी मांडलेली बाजू विचारात घेऊन अर्जदाराने प्रथम अपील निकालात काढण्यांत आले आहे. यासंबंधी अपीलीय प्राधिका-यांचा आदेश दि.१७.३.२००९ च्या पत्राव्दारे अर्जदाराला कळविण्यांत आला आहे.**

**प्रसगतः असेही नमूद करण्यांत येते की, अर्जदार यांनी यापूर्वी त्यांच्या दि.१४.११.२००८ च्या अर्जाव्दारे अवर सचिव पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने मागविलेल्या माहितीपैकी सन २००३ ते २००७**

पर्यतच्या पदोन्नती सूचीवर कार्यवाही झालेली असल्यामुळे त्यांना आवश्यक महिती उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.

सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी यांनी असे निर्दशनास आणले की, काही प्रकरणी गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्याने विभागीय पदोन्नती समितीचा अंतिम निर्णय होणे बाकी आहे म्हणून कागदपत्र उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाहीत. याबाबतीत कार्यवाही पूर्ण झालेली आहे अशा कागदपत्रांचा अर्जदारास उपयोग होऊ शकतो ते पुढीलप्रमाणे आहेत :-

१. मागासवर्ग कक्षाने निश्चित केलेल्या आरक्षणाची टिप्पणी
२. पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराची यादी.

ही माहिती अर्जदारास सात दिवसाचे आत देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३७०/०२

श्री. कृष्णा सदानंद आचरेकर अपिलकर्ता
सी-१ साईधाम को.ऑप हौसिंग सो.लि.
महातार पाखाडी, मराठा सहकारी बॅंकेच्या पाठीमागे,
एक्सर रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई ९१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक
सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, मुंबई ४०० ०१

जन माहिती अधिकार तथा सहाय्यक निबंधक एफ/एस विभाग उत्तरवादी
मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ. समोर मुंबई ४०० ०१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : २.४.२००९
सुनावणीचा दिनांक : २९.५.२००९

अपिलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अर्जदारास सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज को.ऑप क्रेडिट सोसायटीबाबत केलेल्या तक्रारीनुसार माहिती पाहिजे होती. त्यानुसार अर्जदारास दि.१२.१.२००९ रोजीच्या अर्जानुसार दि.२३.१.२००९ रोजी सहायक निबंधक सहकारी संस्था, एफ/एस या जन माहिती अधिका-यानी मुद्दा क्र.१ व २ वर माहिती दिली व मुद्दा क्र.३ व ४ बाबत माहिती क्षेत्र "एल" या विभागाशी संबंधित असल्यामुळे सदरील कार्यालयातील कर्मचारी संस्थेची तपासणी घेऊ शकत नाहीत असे कळविले. अर्जदाराचा अर्ज हा एल विभागाकडे पाठविण्यांत आला तसेच अर्जदाराने सुध्दा "एल" विभागाकडे प्रत्यक्ष अर्ज दिला होता. मात्र तो अर्ज पुन्हा सहायक उपनिबंधक एफ/एस विभागाकडे पाठविण्यांत आला आहे. सहायक निबंधक यांचे आदेशानुसार सदर सोसायटीचे कामकाज "एल" विभागाकडे असल्याने सदर तक्रार अर्जासंबंधी "एल" विभागाने माहिती देणे आवश्यक होते. त्यानुसार अर्जदारास "एल" विभागाने १५ दिवसाचे आत माहिती द्यावी तसेच अपील अर्ज "एल" कार्यक्षेत्रातील अर्ज असताना सुध्दा तो दुस-या कार्यालयाकडे का पाठविण्यांत आला याचा खुलासा त्या विभागाने आयोगास १० दिवसांचे आत करावा. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी "एल" विभाग यांनी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तयांनाहि या आदेशाची एक प्रत आयोगाने सरळ पाठवावी. तसेच जन माहिती अधिकारी एफ/एस विभागाने सुध्दा त्यांनाहि प्रत पाठवावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २९ मे २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३७१/०२

श्री. कारभारी लहानू गर्जे — अपिलकर्ता
गौरीपूत्र १४४/४३१८
कन्नमवार नगर, २ विक्रोळी पूर्व,
मुंबई ४०००८३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी — उत्तरवादी
शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,
प्रशासन भवन, इमारत क्र.२ २ रा मजला आर.सी.चेंबूरकर मार्ग,
चेंबूर पूर्व मुंबई ७१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : २.४.२००९
सुनावणीचा दिनांक : २९.५.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

श्री.कारभारी लहानू गर्जे, यांनी सावित्रीबाई फुले विद्यालय, रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर पूर्व या शाळेची सखोल चौकशी करुन कारवाई होण्याबाबतचे पत्र शिक्षण निरिक्षक उत्तर विभाग या कार्यालयात दि.७.१०.२००८ रोजी दिलेले होते. सदर शाळा विना अनुदानित आहे. श्री.गर्जे यांनी मागितलेल्या माहितीचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१. सावित्रीबाई फुले विद्यालय माध्यमिक विभागातील कर्मचा-यांना वेतन ज्या बॅकेतून दिले जाते त्या बॅकेच्या पासबुकची प्रमाणित छायांकित प्रत.
२. सावित्रीबाई फुले विद्यालय माध्यमिक कर्मचा-यांच्या उत्पन्न कराबाबत कागदपत्रांच्या प्रमाणित छायाकित प्रती.
३. सावित्रीबाई फुले माध्यमिक विभाग शाळेचे स्थलांतर श्रेष्ठ क्लासेसच्या जागेत केलेल आहे. सदर शाळेच्या स्थलांतरणबाबत शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग, चेंबूर (पू)मंबई ७१ या शिक्षण खात्याकडून घेतलेल्या परवानगी कागदपत्राच्या प्रमाणित छायांकित प्रती.
४. सावित्रीबाई फुले विद्यालय माध्यमिक विभागातील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांचीसेवा जेष्इता यादीची प्रमाणित छायांकित प्रत प्राप्त होणेबाबत.
५. सावित्रीबाई फुले विद्यालय माध्यमिक विभाग मुख्याध्यापक व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना घेतलेल्या मान्यता पत्राच्या छायांकित प्रमाणित प्रती प्राप्त होणेबाबत.
६. कर्मचारी वैद्यकिय तपासणी झालेल्या कागदपत्राच्या प्रमाणित छायांकित प्रती मिळणेबाबत.
७. कर्मचा-यांच्या नियुक्ती पत्राच्या छायांकित प्रती प्राप्त होणेबाबत.
८. सावित्रीबाई फुले माध्यमिक विभाग व श्रेष्ठ क्लासेस वर्ग भरविणेबाबतची चौकशी होऊ अहवाल मिळणेबाबत.

९. अप्रशिक्षित शिक्षकांच्या नियुक्तीबाबत श्यामसुंदर महादेव शिरसाठ हे अप्रशिक्षित शिक्षक नेमले आहेत. त्यांच्या नेमणुक पत्राची छायांकित प्रत व त्यांच्या पदाला शिक्षण निरिक्षक उत्तर विभाग यांनी दिलेल्या मान्यता पत्राची छायांकित प्रत.

१०. शाळांच्या भौमिक सुविधांची माहिती अहवाल प्राप्त होणेबाबत

अ. शाळेच्या कार्यालयासाठी व शिक्षक वर्गासाठी स्वतंत्र खोल्याबाबतची माहिती मिळावी.

ब. शाळेला प्रयोगशाळा नाही. प्रयोगशाळा व ग्रंथालयाबाबतची माहिती अहवाल प्राप्त व्हावा.

क. विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नाही. असल्यास त्याबाबतचा अहवाल प्राप्त व्हावा.

ड. शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नाही इत्यादि बाबी तपासून अहवाल मिळणेबाबत.

वरील सर्व मुद्दयाचा विचार करता, सर्व मुद्दे हे शाळेशी व संस्थेशी संबंधीत असून सदर माहिती शाळेचे माहिती अधिकारी मुख्याध्यापक यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी व या संदर्भात शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग यांनी श्री. गर्जे यांच्या अपिलीय अर्जावरील सुनावणी दि.२३.१.२००९ रोजी घेऊन शाळेच्या मुख्याध्यापकांना श्री.गर्जे यांनी मागितलेली माहिती, वेळेत सादर करण्याबाबत दि.३०.१.२००९ च्या पत्रानुसार कळविले होते. सदर माहिती देण्याचे मुख्याध्यापक व संस्थेने मान्य केले आहे.

अपिलार्थीस शाळेकडून माहिती न मिळाल्यामुळे आयोगाकडे सदरील अपिल सादर केलेले आहे. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी यांनी असे सांगितले की, सदर शाळेविषयी त्यांनी शिक्षण निरिक्षक यांचेकडे तक्रार दिलेली आहे. त्या तक्रारीची चौकशी झालेली आहे. शाळेने माहिती देण्याऐवजी त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अहवाल त्यांना मिळाला तरी त्यांचे माहितीचे काम भागेल. सदरील अहवालाची प्रत एक महिन्याचे आंत अर्जदारास देण्याचे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३८१/०२

श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण — अपिलकर्ता
८५/२, चाळके चाळ,
ताडवाडी स्वदेशी मिल, सायन
चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा संचालक,
पुराभिलेख संचालनालय, १५६ एलफिस्टन महाविद्यालय इमारत,
महात्मा गांधी रोड, मंबई ४०० ०३२

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक — उत्तरवादी
पुराभिलेख संचालनालय, १५६ एलफिस्टन महाविद्यालय इमारत,
महात्मा गांधी रोड, मंबई ४०० ०३२

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १.४.२००९
सुनावणीचा दिनांक : २९.५.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपिलार्थीने दि.१०.१२.२००८ रोजीच्या अर्जाने जन माहिती अधिकारी पुराभिलेख संचालनालयास नेमणुकीच्या बाबत काही माहिती मागितली होती. त्यानुसार दि.१९.१२.२००८ रोजी असे कळविण्यांत आले की, "अपिलार्थीच्या अर्जातून त्यांना नेमकी कोणती माहिती हवे आहे ते स्पष्ट होत नाही. त्यामुळे या कार्यालयात अपिलार्थीने समक्ष येऊन त्यांना कोणती माहिती हवी आहे ते स्पष्ट करावे. जेणेकरुन अपिलार्थीस माहिती देणे सोयीचे होईल ".

अर्जदाराने साध्या परंतू सोप्या भाषेत अर्ज करावा अशा सुचना आयोगाने यापूर्वी आयोगाने घेतलेल्या अपील सुनावणीच्यावेळी अपिलार्थीस दिलेल्या आहेत. परंतू यावेळी सुध्दा जे क्लिष्ट भाषेचाच उपयोग करतात असेच दिसून आलेले आहे. तरी अर्जदाराने जन माहिती अधिका-यांकडे सुटसुटीत भाषेत माहिती मागून शब्दाचे अवडंबर न माजविता त्यांना कोणती माहिती पाहिजे आहे हे समजावून सांगावे त्यानंतर १० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३७७/०२

श्री.कुंदन अहया अपिलकर्ता
अे/६०२, गोकुळे नगरी
१ ऑफ हायवे कांदिवली पूर्व
मुंबई ४००१०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी उत्तरवादी
मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय,
एम.एम.आर.डी.ए.इमारत, १ ला मजला,
बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०००५

जन माहिती अधिकारी
मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांचे कार्यालय
एम.एम.आर.डी.ए.इमारत, १ ला मजला,
बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०००५

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १९.३.२००९
सुनावणीचा दिनांक : ३०.५.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अर्जदाराने दि.२४.१२.२००८रोजीच्या अधिनियमाच्या कलम ६अन्वये केलेल्या अर्जानुसार त्यांना सादर केलेल्या खरेदी खताच्या करारनामा (ऑफीस क्र.पीबीडीआर-२/१७६/९७) च्या संदर्भात माहिती विचारली होती. हा अर्ज मुद्रांक जिल्हाधिकारी,बोरीवली यांना सादर केला होता. त्या कार्यालयाने दि.२३.१.२००९ रोजी अर्जदारांने अपेक्षिलेली माहिती दुय्यम निबंधक व प्रशासकिय अधिकारी, मुंबई जिल्हा यांच्या कार्यकक्षेत येत असल्याने त्यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठविला व त्याची प्रत अर्जदारास पाठविली. अर्जास प्रतिसाद न मिळाल्यामुळे अर्जदाराने दि.७.२.२००९ रोजी प्रथम अपील केले.व ते प्रथम अपिलीय अधिकारी, मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांच्याकडे पाठविले हेही अपिल दुय्यम निबंधक मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे दि.६.३.२००९ रोजी पाठविण्यांत आले.

अर्जदारास जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक व प्रशासकिय अधिकारी,जिल्हा उपनगर यांच्या दि.९.३.२००९ रोजीच्या पत्राने सबंधित माहिती दिली. अर्जदाराचे म्हणण्यानुसार त्यांना हे पत्र दि.२८ मे २००९ रोजी व्यक्तिश: मिळाले. अर्जदाराच्या प्रश्नावलीच्या संदर्भात रेकॉर्ड प्रमाणे माहिती देण्यांत आलेली आहे. प्रश्नावलीचा काही भाग उलट तपासणीच्या स्वरुपाचा दिसतो. त्या संदर्भात कागदपत्र नसल्यामुळे त्यासंबंधी जन माहिती अधिका-यांनी माहिती दिलेली नाही.

अर्जदाराचा रजिस्ट्रेशन करण्यासाठी १० वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही अर्जदारास काहीही कळविण्यांत आले नाही, हा उद्वेग समजण्यासारखा आहे. अर्जदाराने दिलेले लेखी निवेदन व दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पुढील गोष्टी स्पष्ट झालेल्या आहेत.

मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयास अर्जदाराचा अर्ज हा २४डिसेंबर २००८रोजी प्राप्त झाला हया अर्जातील मजकूर हा दुय्यम उपनिबंधक, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याशी संबंधीत आहे तर अर्जदाराचा अर्ज हा दि.२९ डिसेंबर २००८पूर्वी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठवणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात हा अर्ज दि.२३.१.२००९ रोजी पाठविलेला आहे. म्हणजे २४ दिवसाचा विलंब अर्ज पाठविण्यासाठी झालेला आहे. हया विलंबासाठी जन माहिती अधिकारी, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,बोरीवली हे जबाबदार आहेत. हया विलंबासाठी कुठलाही लेखी अथवा प्रत्यक्ष तोंडी खुलासा करण्यांत आलेला नाही. त्यामुळे हया विलंबास अधिनियमाच्या कलम २० नुसार जन माहिती अधिकारी मुद्रांक जिलहाधिकारी कार्यालय यांचेवर २४ दिवस x रु.२५० = रुपये ६०००/- या रक्कमेची शास्ती लादण्यांत येत आहे. ही रक्कम दि.१ जुलै २००९ रोजी होणा-या वेतनातून वसूल करुने शासनाने विहित केलेल्या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षा खाली जमा करण्यांत यावी.

अर्जदाराचा अर्ज अशा रितीने संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.१.२००९ रोजी पाठविला गेल्यानंतर त्यांना मिळालेल्या तारखेपासून एका महिन्याच्या आत ही माहिती देणे आवश्यक हाते. जर हा अर्ज दि.१.२.२००९ रोजी दुय्यम निबंधक, मुंबई उपनगर बांद्रा कार्यालयास प्राप्त झाला असे जर गृहीत धरले तरी दिलेल्या माहितीचा दि.९.३.२००९ रोजी दर्शविण्यांत आलेला आहे व अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांना प्रत्यक्षात ही माहिती दि.२८.मे २००९ रोजी प्राप्त झालेली आहे. याबाबतीत माहिती देण्यास झालेला विलंब व अर्जदारास लिहिलेल्या पत्राचा दिनांक व त्यांना प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या दिनांकाची अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणेच तारीख यातील दिर्घ अंतर लक्षात घेता झालेल्या विलंबबद्दल अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती का लादण्यांत येऊ नये याचा लेखी तसेच प्रत्यक्ष खुलासा दुय्यम निबंधक व प्रशासकिय अधिकारी, उपनगर जिल्हा, बांद्रा यांनी दि.२४.६.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोगाच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.
संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

Í आदेशाची प्रत दुय्यम निबंधक व प्रशासकिय अधिकारी, एम.एम.आर.डी.ए.इमारत, १ ला मजला,बांद्रा,पूर्व, मुंबई ५१ यांना प्रत देण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० मे २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३२०/०२

श्री.भरत प्रभाकर शिंपी — अपिलकर्ता
प्लॉट नं.७ गणेशवाडी, परमार्थ साधना मंदिरासमोर
जिल्हा पेठ जळगांव ४२५ ००१

प्रथम अपीलीय प्राधिकारी जिल्हा उपनिबंधक — उत्तरवादी
सहकारी संस्था, जळगांव

जन माहिती अधिकारी सहायक निबंधक
सहकारी संस्था, जळगांव

-विवेचन-

श्री. भरत प्रभाकर शिंपी यांनी आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दि.१.११.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३)अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.३०.९.२००८ च्या निर्णयात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेशी माहिती देण्याच्या/मिळवून देण्याच्या संदर्भात संपर्क साधावा, असे निर्देश देण्यात आलेत. मात्र त्यांचे पालन झालेले नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील करण्यांत आले आहे.

सहकारी संस्थेच्या बाबतीत सदस्याला आपल्या सोसायटीकडून कोणती माहिती प्राप्त घेता येईल यासंबंधी महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह ॲक्ट १९६०च्या कलम ३२ मध्ये तरतूद आहे. या तरतूदीनुसार असलेली माहिती ही सोसायटीने सभासदास देणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र को-ऑप. सोसयटी रुल १९६१च्या कलम ३० नुसार कुठल्याही सोसायटीच्या बाबतीत ११ प्रकारचे डॉक्यूमेंटचे इन्स्पेक्शन घेऊन त्याच्या प्रती प्राप्त करुन घेऊ शकतात अशी तरतूद आहे.

अर्जदाराची माहितीची मागणी हया दोन्ही दृष्टीने समर्थनीय आहे. संबंधित सहकारी संस्था अर्जदारास त्यांचेकडे विनंती करुनही माहिती देता येत नाही, असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्यामुळे नियम-३० खाली येणारी माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी सोसायटीकडून त्यांच्या रेकॉर्डमधून घ्यावी व सोसायटीकडून मिळवून त्यांनी अर्जदारास देणे हे बंधनकारक आहे व संस्थेच्या पातळीवरील माहिती ही संस्था देईल, याचीही शिस्त निर्माण करणे आवश्यक आहे व एवढेकरुनही संस्था निर्देशाचे पालन करीत नसेल तर त्यांच्या विरुध्द कारवाई करणे हेही त्या अधिका-याच्या जबाबदारीत येते. त्या दृष्टीने अर्जदाराला हवी असणारी माहिती वर उद्धृत केलेले अधिनियम व रुल्स यातील तरतूदीनुसार अर्जदारास एक महिन्यात देण्यांत यावी किंवा मिळवून देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ मे २००९

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य
# १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
# मादाम कामा रोड, मुंबई - ३२

आदेश क्र. मुमाआ-२००९/ /अपील क्र. ३६९१ /०२

**श्री. कौस्तुभ गोखले** ------- अपिलार्थी
**सिध्दीविनायक प्रसाद डॉ.शामाप्रसाद**
**मुखर्जी रोड, डोंबिवली पूर्व**
**४२१ २०१ ता.कल्याण जिल्हा ठाणे**

विरूध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव(नवि-२८)** ------- उत्तरवादी
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(नवि-२८)**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२**

**-- विवेचन --**

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : दि.३.८.२००८ चा माहितीचा अर्ज दिनांक ६.८.२००८ रोजी प्राप्त झाला |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक | :दि.२२.८.२००८ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | :दि.२३.८.२००८ |
| प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | :दि.१८.९.२००८ |
| द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक | :दि.२०.१०.२००८(प्राप्त दि.२२.१०.२००८) |

**सुनावणीचा दिनांक** :
**अपिलार्थी** : अनुपस्थित
**जन माहिती अधिकारी** : अनुपस्थित
**अपिलीय अधिकारी** : उपस्थित

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :तत्कालीन अ.मु.स. (सेवा)मा.श्री.नविनकुमार यांचे दि.२५.८.२००५ चे परिपत्रक व तत्कालीन प्रधान सचिव,न.वि.विभाग मा.नानासाहेब पाटील यांचे दि.२५.४.२००६ चे पत्र कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला लागू आहे का? सदर परिपत्रक पत्राचे**

उल्लंघन झाल्याप्रकरणी दि.१७.४.२००८रोजी केलेल्या निवेदनावर काय काग्रवाही करण्यांत आली इत्यादि माहिती.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :

१. संदर्भाधीन परिपत्रक/पत्र कल्याण डोंबिवली म.न.पा. ला लागू आहेत.

२. दि.१७.४.२००८ चया निवेदनाच्या अनुषगाने म.न.पा.कडून अहवाल मागविण्यांत आला आहे.

३. प्रस्तुत मुद्यावर सर्वसाधारण स्वरुपाची माहिती कार्यासनाच्या अभिलेखात उपलब्ध नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :

"शासकिय माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.१ अ व ब ची माहिती दिलेली आहे. आणि ती योग्य आहे, परंतू क व ड बद्दल स्पष्ट माहिती दिलेली नाही. ती तीन दिवसांच्या आंत द्यावी"

सुनावणी दिनांक ९.२.२००९ रोजी ११.३० वाजता

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचा दि.३.८.२००८ चा माहिती अर्ज व अपीलीय प्राधिकारी (नवि २८)यांचे दि.१८.९.२००८ आदेश यांचा संदर्भ देऊन दि.८.१०.२००८ रोजी पत्र पाठविलेले आहे. त्यामध्ये मुद्दा क्र. क व ड बाबतची माहिती व सद्य:स्थिती दिली आहे. तथापि अपिलार्थीस सदर पत्र व्दितीय अपिलाच्या तारखेपर्यत म्हणजे दि.२०.१०.२००८ पर्यत मिळाले नसल्याचे व्दितीय अपिलात नमूद केलेले आहे.

अपिलार्थीस दि.८.१०.२००८ रोजीच्या पत्राची प्रत पुन्हा पाठवावी तसेच दरम्यान बराच कालावधी लोटला असल्याने १५ दिवसात क व ड मुद्याबाबत सद्य:स्थितीची पुन्हा माहिती द्यावी.

आदेश : अपिल निकाली काढण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: राज्य मुख्य माहिती आयुक्त